पन्नास पैसे

शनिवार
३० सप्टेंबर १९७२

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : अठरा

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

## सप्रेम नमस्कार

२३ सप्टेंबर, ७२

□ 'माणूस'च्या ताज्या अंकात 'आले-पाक'कार अनंतरावांनी 'लेडी चॅटर्लीज लव्हर'बद्दल लिहिले आहे ते मिष्किल-पणाने की अज्ञानाने ? 'लेडी चॅटर्लीज्'च्या आधीच्या खडर्याचे शीर्षक 'जॉन थॉमस व लेडी जेन' असे होते अशी माहिती देऊन अनंतरावांनी असे सूचित केले आहे, की हे शीर्षक फारच मिळ-मिळीत झाले असते. खरे पाहाता, 'जॉन थॉमस अ‍ॅण्ड लेडी जेन' हे शीर्षक अत्यंत खळबळजनक व स्फोटक ठरले असते; कारण 'जॉन थॉमस' व 'लेडी जेन' या दोन्ही नावांना या कादंबरीच्या नायक-नायिकेच्या गुप्त परिभाषेत विशिष्ट अर्थ आहे. पर-स्परांच्या इंद्रियांचा उल्लेख ते दोघे या नावांनी करतात !

ते शीर्षक मिळमिळीत व निरुपद्रवी झाले असते, असे साळसूदपणाने लिहून 'अनंतराव' मराठी वाचकांची फिरकी तर घेत नाहीयेत ना ?

प्र. ना. परांजपे, मुंबई

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

विज्ञानेश्वरी

# टयूब रेल्वे आणण्यापूर्वी प्रा. कोसंबींना विसरू नका

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

प्रा. डी. डी. कोसंबी म्हणजे एक महाविलक्षण व्यक्तिमत्त्व. कोसंबी फार मोठे शास्त्रज्ञ होते. संख्याशास्त्रज्ञ म्हणून त्यांचा लौकिक होता. 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या संस्थेत त्यांनी अणुविज्ञानावरही मोलाचे संशोधन केले होते. – पण कोसंबींची प्रतिभा प्रयोगशाळेच्या चार भिंतीत बंदिस्त होऊन कधीच पडली नाही. कोसंबींनी या देशावर, या देशातील लोकांच्यावर आणि या देशाच्या इतिहासावर अमाप प्रेम केले. 'An Introduction to the study of Indian History' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांच्या 'The culture and civilisation of Ancient India in Historical outline' या ग्रंथाने तर पाश्चात्त्य इतिहासतज्ज्ञांत खळबळ उडवून दिली होती. कोसंबी हे सारे सांभाळून विज्ञानाच्या इतरही क्षेत्रात संचार करीत. प्राचीन नाण्याचे वय शोधण्याची त्यांनी शोधलेली पद्धत जगत्मान्य आहे. कोसंबींचा सर्वात मोठा विशेष म्हणजे त्यांचा निर्भय सडेतोड स्वभाव. या स्वभावामुळे कोसंबींनी अनेक उच्चपदस्थांना दुखावले. त्यांची भांडणे ओढवून घेतली. त्या उच्चपदस्थांशी निर्भयपणे टकरा दिल्या. स्वत: रक्तबंबाळ होईपर्यंत टकरा दिल्या.

२३ एप्रिल १९६६ हा दिवस दिल्लीतील विज्ञान जगात खळबळजनक ठरला. त्या दिवशी, आशियातील आणि आफ्रिकेतील शास्त्रज्ञांच्यासमोर कोसंबींनी एक सडेतोड भाषण ठोकले. त्यांचे हे भाषण एवढे रोखठोक आणि जळजळीत होते, की काही मंत्री आणि शास्त्रज्ञ हे भाषण निम्म्यावर सोडून उठून गेले. प्रा. कोसंबींचे हे भाषण आणखीही एका कारणाने संस्मरणीय आहे. त्यांच्या आयुष्यातील ते शेवटचे भाषण ठरले. २९ जून १९६६ ला कोसंबी स्वर्गवासी झाले. साडेतीनशे कोटी रुपये खर्चून भुयारी रेल्वे मुंबईत आणण्यापूर्वी प्रा. कोसंबींचे ते अखेरचे भाषण आपण वाचणे अगत्याचे आहे. □

'लहानपणी आम्ही फार गरीब होतो. माझी आई मला नेहमी सांगे, गरीब असण्यात पाप नाही. गरीब राहणे मात्र जरूर पाप आहे. आमची गरिबी

दूर व्हावी म्हणून माझी आई खूप कष्ट करी. मला योग्य शिक्षण मिळावे म्हणूनही ती दक्ष होती. आशिया आणि आफ्रिकेतील प्रमुख शास्त्रज्ञांच्यासमोर बोलताना मला नकळत ही गोष्ट आठवते आहे. आपण सारेचजण तसे फार मोठे शास्त्रज्ञ आहोत. – निदान आपल्या देशातील अशिक्षित जनता तसे समजते !

विज्ञानाशिवाय आपल्या गरीब भुकेकंगाल देशाला तरणोपाय नाही, हे तुम्ही सारेजण मनोमन जाणून आहात पण विज्ञान समजणे आणि समृद्धीसाठी विज्ञान राबवणे या सर्वस्वी वेगळ्या गोष्टी आहेत. जीवननिष्ठा म्हणून विज्ञान स्वीकारणे हे तर महाकठीण काम आहे. विज्ञान स्वीकारताना अनेक जुन्या गोष्टींचा त्याग करावा लागतो. अनेक अप्रिय वाटणाऱ्या नव्या गोष्टी स्वीकाराव्या लागतात. मला माझ्या देशाच्या इतिहासाबद्दल प्रेम वाटत नाही असे नव्हे. भारतीय गणितशास्त्र एक वेळ आघाडीवर होते. पण आज या कालचा उपयोग नसतो. आजच्या जगात भारतीय गणित, आफ्रिकन रसायनशास्त्र, इंडोनेशियाचे वैद्यकशास्त्र, असले हास्यास्पद प्रकार संभवत नाहीत. विज्ञानाला देशाच्या सीमा आणि देशाचे इतिहास माहीत नसतात. विज्ञान स्वीकारताना देशाचे इतिहास आणि आपले परंपरागत मानबिंदू बाजूला ठेवावे लागतात ! आणि हे करत असतानाच आणखी एक गोष्ट करावी लागते. वरवर ही गोष्ट माझ्या पहिल्या विधानाशी विसंगत वाटेल. विज्ञान आपण परदेशातून आणून पाहिजे तसे आपल्या भूमीत रुजवू शकत नाही. वैज्ञानिक शोध आपल्या देशात

[ पृष्ठ ६० वर ]


---

## भुयारी रेल्वे

लंडनमधील पाच प्रख्यात वहातूक तज्ज्ञांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे, ३५० कोटी रुपये खर्चून कुलाबा ते कुर्ला असा भुयारी रेल्वे मार्ग मुंबईत बांधला जाईल. या योजनेचे काम १९७३ च्या दिवाळीत हाती घेतले जाईल आणि १९८४ सालापर्यंत ही योजना पुरी होईल. या भुयारी रेल्वेची लांबी २० किलोमीटर्स असेल. पूर्वीच्या ट्रॅम रस्त्याच्या खालून जाणारी ही रेल्वे, भायखळा, काळबादेवी, भुलेश्वर या जगातील सर्वांत दाट लोकवस्तीच्या विभागातून जाणार आहे. भुयारी रेल्वे आणि सध्याची रेल्वे यांना जोडणारे जिने, चर्चगेट, व्ही. टी. भायखळा आणि महालक्ष्मी येथे बांधण्यात येतील.

—'टाइम्स ऑफ इंडिया

---




# निळूभाऊ आणि म्युन्सिपालटी !

एमेम

एखाद्या संस्थेविरुद्ध नेहमी ओरड करणाऱ्या व्यक्तीलाच त्या संस्थेचा प्रमुख म्हणून नेमल्यास ती व्यक्ती अगदी बदलून गेल्याचे आपण पहातो. म्हणजे त्या संस्थेविरुद्ध कोणी काही बोलल्यास हिचे पित्त खवळते ! आपल्या महापौर निळूभाऊ लिमयांचे असेच झाले. म्हणजे ते एकदा सहज बोलून गेले. प्रसंग होता केळकर जन्मशताब्दी महोत्सवाचा ! 'पत्रकार केळकर' या संदर्भात बोलताना ते म्हणाले, 'केळकर केवळ चांगलेच लिहित. ते २०–२२ वर्षे महापालिकेचे (म्हणजे त्या वेळच्या म्युन्सिपालटीचे) सभासद होते. त्या वेळी तेथील सभांचे वृत्तांत ते स्वतः केसरीत लिहित. पण लिहिताना ते एक पथ्य पाळीत असत. वाईट गोष्टी टाळून केवळ चांगल्या घटनांचेच ते वर्णन करीत. नाहीतर सध्याचे पत्रकार ! महापालिकेतील गडबड गोंधळाला तिखटमीठ लावून वर्तमानपत्रात बातम्या देतात. खून, बलात्कार वगैरेसारख्या बातम्यांप्रमाणे महापालिकेतील प्रसंग (चौकटी वगैरे टाकून) रंगविले जातात !' यावर आम्ही हसलो. (कारण समारंभाचे अध्यक्ष यशवंतराव चव्हाणही हसत होते !) आम्ही हसताना पाहून शेजारचा आमचा पत्रकार मित्र मात्र खवळला आणि म्हणाला, 'हसतोस काय, हा आपल्यावर अन्याय आहे. म्हणजे यांनी गोंधळ घालायचा आणि तो अनिष्ट असला तरी आम्ही छापायचा नाही

धाचा अर्थ काय?' यावर आम्ही आणखी हसलो आणि तो गप्प बसला. (कारण इतर पाचसहा जणांनी त्याला दटावले!)

आम्हांला मात्र निळूभाऊंचे राहून राहून आश्चर्य वाटत होते. महापौर व्हायच्या आधी हेच निळूभाऊ वर्तमान-पत्रात आलेल्या पालिकेतील गोंधळाच्या बातम्या वाचताना रंगून जात, हे आम्ही आमच्या डोळ्यांनी पाहिले आहे. इतकेच नव्हे तर ते असेही म्हणत, 'या मसाले-दार बातम्यांच्या चवीपुढे आमच्या पूनम हॉटेलमधील मसालेदार कोंबडीची चव झक मारेल!' वास्तविक, पुणे महापालिकेच्या सभावृत्तांताचे संकलन करून प्रसिद्ध केल्यास त्याला दरवर्षी सर्वोत्कृष्ट विनोदी वाङ्मयाचे पारि-तोषिक मिळू शकेल! माधवराव जोश्यांनी 'संगीत म्युन्सिपालटी' हे अजरामर नाटक पुणे म्युन्सिपालटीच्या आधारावरच लिहिले. (चूकभूल द्यावी–घ्यावी!) या नाटकातील कुठलेही पान उघडून वाचल्यास ते सद्य:स्थितीशी तंतोतंत जुळताना दिसेल! असे असताना आताच निळूभाऊ पत्रकारांवर एकदम का उखडले? उत्तर सोपे आहे, कारण ते आता महापौर झाले आहेत. महा-पालिकेतील बऱ्यावाईटाची जबाबदारी महापौरांवर येते असा (गैर)समज त्यांनी करून घेतलेला दिसतोय.

या प्रकरणात निळूभाऊंना एक्झॅक्टली काय म्हणायचंय ते कळत नाही. हे गोंधळाचे प्रसंग अजिबातच लिहू नयेत असं त्यांना म्हणायचंय् का प्रसंग लिहिल्यास जेणेकरून कुणाची बदनामी होणार नाही असे लिहावेत असं म्हणा-यचंय्! असंच जर असेल तर आम्ही काही बातम्या लिहून दाखवितो.

उदाहरणार्थ: महापालिकेत आरडा-ओरडा, उखाळ्या-पाखाळ्या नेहमीच चालतात. पण त्यावर आम्ही असे लिहिणार– 'एक तासभर वैचारिक आणि अभ्यासपूर्ण चर्चा झाल्यावर सर्व सभासद दमून गेले होते व बसल्याजागी अवघडले होते. म्हणून काहीजण उठून उभे राहिले व समस्यापूर्तीचा खेळ खेळू लागले. यावेळी काही सभासद तावा-तावाने हातवारे करताना व माना झटकताना दिसत होते. वास्तविक हा 'मसल्स रिलॅक्सिंग'चा प्रकार होता. एका सभासदाने आपल्या चप्पलेचा कोणता खिळा वर आला आहे हे पहाण्याकरिता चप्पल हातात घेतली. त्या वेळी विरुद्ध पक्षाचे सभासद गैर-समजामुळे गरम झाले. पण सत्यस्थिती समजल्यावर ते शांत झाले. नेमका याचवेळी सभागृहाचा ध्वनिक्षेपक बिघडल्यामुळे कोण काय बोलत आहे हे कळत नव्हते. नुसताच कर्कश (पण लयबद्ध) असा आवाज ऐकू येत होता. महापौर सारखे घंटा वाजवीत होते, पण ते केवळ ध्वनिक्षेपकाच्या दुरुस्ती-साठी इलेक्ट्रीशियनला बोलविण्यासाठीच होय!'

असं लिहिलं तर चालेल निळूभाऊ?

किंवा दुसरा प्रसंग: एक सभासद दर दोन-तीन वाक्यानंतरची सुरुवात

[ पृष्ठ ६३ वर ]




# श्यामरावांची दैनंदिनी



① धान्याची रांग ② बसची रांग ③ सिनेमाची रांग ④ गणेश दर्शनाची रांग ⑤ वीजेच्या बिलाची रांग ⑥ मद्य परवान्याची रांग ⑦ ह्या रांगा कशासाठी आहेत हे जाणून घेणाऱ्याची रांग.


१७ सप्टेंबर

गुजरातचे वाळके गवत बंद झाले. उपासमार सुरू झाली. तरी भैया चार पाच लिटर पिळून घेतोच. ही खरी आमची पिळवणूकच आहे.



१८ सप्टेंबर


आठ पूर्णांक तेहेत्तीस टक्के
बोनस मिळाला खरा पण
त्या रकमेत साधा
टेलिव्हीजन सुद्धा
मिळत नाही हे दुर्दैवच!
१९ सप्टेंबर


XII
I
II
III
IV
V
VI
VII
XI
रेल्वेच्या या
घड्याळाखाली
आता प्रेमाच्या फुकट
आणाभाका घेता
येणार नाहीत.
तिकीट पडेल.
20 सप्टेंबर


पपा 'दोन रूपये' उसने देता? परमिट काढावं म्हणतो!
२१ सप्टेंबर


गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या येताना न विसरता पाऊसपण आणा.
अनंतचतुर्थी २२ सप्टेंबर

# दारिद्र्याचे आव्हान आम्ही कसे स्वीकारणार ?

गुन्नार मिर्धाल यांच्या
जगप्रसिध्द ग्रंथाची ओळख

रा. म. बिवलकर

या देशाला पाचव्या पंचवार्षिक योजनचे वेध लागले आहेत. या योजनाकाळात या देशातील योजनाबद्ध आर्थिक विकासाचा ढाचाच बदलून टाकण्याचा विचार सर्वत्र बोलला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर, स्विडिश अर्थतज्ञ श्री. गुन्नार मिर्धाल, यांनी पाच वर्षापूर्वी विकसनशील राष्ट्रांच्या विकासाच्या नेमक्या समस्येवर अचूक बोट ठेवणारा एशियन ड्रामा नावाचा जो बावीसशे पानी ग्रंथराज प्रसिद्ध केला व त्यानंतर अलीकडे दि चॅलेन्ज ऑफ वर्ल्ड पॉव्हर्टी या नावाचा त्या ग्रंथाचा जो छोटा अवतार प्रसृत केला, त्यातील विचारधारेचा परिचय उद्बोधक ठरावा.

एकोणीसशे अडुसष्ट साली, तीन खंडात प्रसिद्ध झालेला एशियन ड्रामा हा ग्रंथ, गेल्या शतकात प्रसिद्ध झालेल्या डॉ. कार्ल मार्क्स यांच्या दास कापितालच्या वा १९३१ साली प्रकाशित झालेल्या लॉर्ड जे. एम. केन्स यांच्या जनरल थिअरी या ग्रंथाच्या तोडीचा ग्रंथ म्हणायला हवा. पण बावीसशे पानांचा तो ग्रंथ वाचताना मी मी म्हणणाऱ्या बुद्धिवादी अर्थज्ञांचीसुद्धा दमछाक झाली असेल. मग सामान्य माणूस त्याच्या वाटेला मुळीच गेला नसेल यात शंका नाही. म्हणूनच आपल्या ग्रंथराजाचे सार श्री. मिर्धाल यांनी आपल्या साडेपाचशे पानी नव्या ग्रंथात आणले. विकसनशील राष्ट्रांच्या विकासाची समस्या, त्यातील अडचणी व धोरणे यांची विचक्षण समीक्षा व त्यावरील मूळ ग्रंथात न सुचविलेले उपाय यांची परखड चर्चा ग्रंथकाराने दि चॅलेन्ज ऑफ वर्ल्ड पॉव्हर्टी या ग्रंथात केली आहे. ती सामान्य माणसांसाठी आहे, राजकारणी मंडळींसाठी आहे, शासनातील अधिकाऱ्यांसाठी आहे आणि विद्वान अर्थतज्ञांनी त्यावर विचार

करावा इतकी मोलाची आहे.

आर्थिक जीवन हा एकंदर मानवी जीवन संघर्षाचा एक भाग आहे. मानवी जीवन संघर्षात अर्थ-जीवनाप्रमाणे इतर अनेक गोष्टींचा गोफ विणलेला असतो. या गोफाची वीण इतकी घट्ट आहे, की त्यातला एक पदर वेगळा काढून त्याचा विशेष अभ्यास करणे, एक तर शक्य नाही व शक्य झाले तर त्या अभ्यासाचा मानवी जीवन संघर्षाशी सुतराम संबंधच उरणार नाही. या गोष्टीची जाणीव असूनही आजवर पाश्चिमात्य अर्थतज्ञांनी व त्यांची कास धरून चालणाऱ्या पौर्वात्यांनी विशेष अभ्यासाच्या नावाखाली अर्थविचार निरुंद केला. त्याला विशिष्ट चौकटीत बसवला. मोजमापाच्या सोईसाठी तो गणिती केला. पण त्यामुळे आपली प्रत्यक्ष परिस्थितीपासून फारकत होत आहे याची जाणीव त्यांना राहिली नाही.

'प्रत्यक्ष जगात आर्थिक समस्या नसतात. फक्त समस्या असतात आणि त्या गुंतागुंतीच्या असतात. त्या सोडवायच्या म्हणजे मानवी जीवनाच्या विविध अंगाचा एकसमयावच्छेद करून विचार करायला हवा. मानवाच्या एकंदर शरीर-संस्थेचा विचार न करणारा फक्त डाव्या नाकपुडीचा स्पेशॅलिस्ट, विद्वान असेल, विशेषज्ञही असेल पण अचूक रोगनिदान करून तो योग्य औषधाचा प्रयोग करू शकणार नाही. अर्थक्षेत्रातील विविध अंगाच्या विशेषज्ञांनी आपले विचार यांत्रिकपणे एकत्र मांडल्याने काही समस्येचे उत्तर गवसायचे नाही.

त्यामुळे प्रो. मिर्धाल यांनी आपल्या ग्रंथात या सांकेतिक पद्धतिने आर्थिक उपपत्ती मांडणाऱ्या मंडळींवर टीकेची झोड उठवली. अविकसित देश अविकसित राहायला जी परिस्थिती कारणीभूत आह त्या परिस्थितीचा वा कारणांचा विचार न करता हे पुस्तकी पंडित साचेबंद विकासप्रक्रीया सुचवित त. अविकसित देशातील विकासविरोधी प्रवृत्ती, सामाजिक परिस्थिती, धार्मिक समजुती या गोष्टींचा नुसता उल्लेख करून–पण त्या नंतर–विकासमार्ग सुचविताना जणू या अडचणी अस्तित्वातच नाहीत असे धरून ही मंडळी चालतात. अविकसित देशांना 'विकसनशील' असे लेबल लावून पश्चिमेतील विकसित देशातील अनेक आर्थिक प्रकल्पनांचे आरोपण ही मंडळी त्या देशावर करतात. उदाहरण द्यायचे झाले तर 'बेकारी' ही गोष्ट घ्या. या देशातले ७५ टक्के लोक आपल्या छोटया मोठया जमिनीच्या तुकडयाना लगडलेले आहेत व शेतमजूर म्हणून मधून मधून मिळणाऱ्या कामामुळे शेतीशी सलग्न आहेत. ही कोटयावधी माणसे अर्धपोटी जगत असूनही 'बेकार' या सदरात ती मोडतील का ? बेकारी ही कल्पनाच कारखानदारीशी निगडित आहे. ज्या देशातील ५० टक्के माणसे मरत नाही म्हणून जगताहेत अशा दारिद्र्याच्या गर्तेत आहेत तिथे 'मागणी' बाजार, 'बाजारातील मूल्यनिश्चिती', या प्रकल्पनांचा कुठे संबंध

तरी लागेल का ? पण अर्थतज्ञ मंडळी या प्रकल्पना अविकसित देशांना लागू पडत नाहीत, इथल्या समस्या व्यक्त करायला असमर्थ ठरतात, हे मानायलाच तयार नाहीत. आज अर्थशास्त्रातील गणिती पद्धतीमुळे, जे मोजता येईल, मापता येईल त्याचाच आर्थिक विश्लेषण पद्धतीत उपयोग केला जातो. त्यामुळे राष्ट्राच्या विकसन प्रक्रियेत, तिथल्या समाजाच्या चालीरीती, वृत्तीप्रवृत्ती, धार्मिक वा इतर समजुती, समाजातील विविध संस्थांचा ढाचा, विविध स्तरांचे संबंध या गोष्टींना विशेष महत्त्व असूनही या गोष्टी आर्थिक विश्लेषणातून बाहेर फेकल्या जातात. पण राष्ट्रजीवनाशी एकरूप झालेल्या या गोष्टींना नॉन इकॉनॉमिक फॅक्टर्स म्हणून दूर खेचून विकसनप्रक्रियेचे केलेले विश्लेषण वांझोटे ठरते. ते दारिद्र्याचे अर्थकारण (Economics of Poverty) न राहता अर्थकारणाचे दारिद्र्य (poverty of Economics) ठरते.

## आकडेवारी

या सगळ्या मंडळींचा भर पुन्हा आकडेवारीवरच. आपल्या हाती आलेली आकडेवारी विश्वसनीय आहे की नाही याची खात्री न करता केलेली निदाने बरोबर कशी ठरतील ? पण अलिकडे विद्वान अर्थतज्ञ, योजनाकार, मंत्री, वर्तमानपत्रवाले ही मंडळी आकडेवारी शिवाय बोलत नाहीत. विचक्षण पद्धतीने परीक्षण केल्याशिवाय चालणाऱ्या या आकडेफेकीचा श्री. मिर्धाल यांनी कडक शब्दात निषेध केला आहे. अहो, जिथे ८० % लोक निरक्षर आहेत, उत्पन्न, हिशेब, विक्री, नफा या गोष्टी ज्यांच्या आकलनाबाहेर आहेत, जिथे बरेचसे उत्पादन 'पोटापुरते' चालते, देवघेव वस्तुविनिमयातून होते, त्या अविकसित देशातील उत्पादन व उत्पन्न यांची आकडेवारी जमवून प्रतिवर्षीचा विकासाचा वेग अमुक टक्के हवा वा आहे, हे सांगणे किंवा तसा, अविर्भाव आणणे ही शुद्ध भोंदूगिरी आहे. असल्या आकड्यावर आधारलेले आर्थिक साचे व त्या अनुरोधाने केलेले विश्लेषण धूळफेक करणारे ठरते. अर्थशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप ते नष्ट करते.

अशा सांकेतिक ढाच्यांच्या गुलामी विश्लेषणातुन अविकसित देशांच्या विकासयोजनांचा विचार सर्वथैव चुकीचा ठरतो. भांडवलगुंतवण वाढवून राष्ट्रीय उत्पादनात वाढ करणे ही विकासाची व्याख्याच इथे चूक ठरते. कारण अशी योजना फक्त पैशाची भाषा बोलते. मागासलेल्या मानवी समाजाच्या वृत्ती, प्रवृत्ती, समजुती, संस्था यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा ती विचारच करीत नाही. श्री. मिर्धाल यांच्या मते, विकास म्हणजे मागासलेल्या समाजाचे संपूर्ण उत्थान होय. आर्थिक उत्थान हा त्या सामाजिक विकास-क्रांतीचा एक भाग ठरेल. त्यामुळे इतर सामाजिक घटकांचा विचार न करता फक्त आर्थिक उत्थान करू जाणे, तसे करताना इतर सामाजिक गोष्टींनी 'जैसे थे' रहावे म्हणून प्रतिपादणे वा त्या गोष्टींचा अपकर्ष होत असता तिकडे दुर्लक्ष करण्यातून, विकास

तर साधणार नाहीच पण नव्याने स्वतंत्र झालेल्या या मागासलेल्या राष्ट्रांचे विघटन मात्र त्यातून संभवेल. त्यामुळे मागासलेल्या राष्ट्राच्या विकसनप्रक्रियेचा सामाजिक आशय विचारात घेऊन निराळ्या पद्धतीने विचार आवश्यक आहे.

या दृष्टीने श्री. मिर्धाल यांनी अविकसित देशातील राज्यपद्धतीचे जे वर्णन व विश्लेषण केले आहे ते मुळातूनच वाचल्यावाचून समजणार नाही.

अविकसित देशातील राज्यसत्ता ही साधारणत: वरच्या वर्गातील लोकांच्या हाती असते. सामान्य माणसाचे नशीब उजळावे म्हणून करण्यात येणाऱ्या सर्व सुधारणा कधीच अंमलात येऊ नयेत म्हणून प्रयत्नशील राहणारी ही मंडळी असतात. समाजात आर्थिक व सांपत्तिक विषमता आहे, ती सारखी वाढते आहे असे दिसत असतानाही पाश्चात्य व एतद्देशीय साचेबंद अर्थज्ञांचा हवाला देऊन ही मंडळी लोकांना सांगत असतात, की 'विकासप्रक्रीयेमध्ये अशी विषमता येणे नैसर्गिक आहे. एकदा विकास झाला की मग विषमता दूर करण्याचे पाहता येईल.' समाजातील खालच्या थरातील लोकांची परिस्थिती सुधारावी म्हणून जाहीर झालेली धोरणे वा कायदे प्रत्यक्षात अंमलात आणले जाऊच नयेत, आणलेच तर ते अशा रीतीने आणावे की गरिबांपेक्षा श्रीमंतांनाच त्यांचा अधिक फायदा लाभावा. ओठी जनकल्याणाची भाषा वागविणारी ही मंडळी पोटी स्वत:च्या कल्याणाच्या क्लृप्त्या वागवीत असतात.

त्यामुळे या देशात कायदे असतात पण त्यातल्या पळवाटा–राजमार्गासारख्या असतात! सामान्यत: कायदे हे पाळण्यासाठी नसतातच! समाजातील समर्थ व्यक्ती व व्यक्तिसमूहांची वागणूक नियंत्रित करावी म्हणून कायदेकानू तयार होतात. पण सरकारी अधिकारी याच मंडळींच्या कच्छपी लागल्यामुळे त्यांची अंमलबजावणी होणेच दुष्कर होते. त्यामुळे कुठल्याही चांगल्या कायद्याचे वांगे वाजते!

प्रस्थापित वर्गांच्या या दडपशाहीविरुद्ध दंड थोपटून उभे राहण्याचे काम वरच्या वर्गातील बुद्धिमान तरुणांनी करावे की नाही? सामाजिक व आर्थिक क्रांतीचे नेतृत्व करावे की नाही? पण मिर्धाल म्हणतात, भारतात ते होत नाही. कारण ही तरुण मंडळी अशा उच्च वर्गीय वातावरणात वाढतात, की आपल्या देशातील गरिबांच्या समस्येशी ती मंडळी एकरूप होऊच शकत नाहीत!

**जनता 'कर्म!'**

अविकसित देशातला राज्यकारभार कुठल्याही शाहीप्रमाणे चालो, सर्व ठिकाणी तो उच्च वर्गीयांच्या हाती असतो आणि तिथली सत्तास्पर्धा वरच्या वर्गातील लोकांमध्येच असल्याने, सामान्य माणसांच्या दडपणामुळे राजसत्तेत बदल झाला असे कधीच होत नाही. सामान्य माणूस राजकीय दृष्ट्या जागृत बनावा, त्याला त्याचे हित कळावे, संघटितपणे त्याने त्याकरता झगडावे, असे शिक्षणच उपलब्ध केले

जात नाही. शिक्षणाच्या प्रसाराचा सारा गाजावाजा धूळफेक करणाराच असतो. पुष्कळ वेळा ते वरच्या वर्गाची सोय पहाणारे ठरते. विकासाशी ते निगडित नसते. त्यामुळे देशाच्या राजकारणात काय चालले आहे याबाबतीत सामान्य जनता निष्क्रीय, उदासीन व मुकी राहते ! जनता ही राजकीय धोरणात 'कर्म' बनते ती 'कर्ता' कधीच असत नाही !

त्यामुळे राजसत्ता आणि अधिकारी गलथानपणाने वागतात. या गलथानपणातही एक शिस्त असते ! त्यातून ठराविक व्यक्ती आणि व्यक्तिसमूहांचे हित बरोबर साधले जाते ! प्रत्येकजण विकासासंबंधी, सामान्य जनतेच्या दारिद्र्याविषयी, उपक्रमशीलतेविषयी बोलत असतो. पण प्रत्यक्षतः ही मंडळी विकास रोधीत असतात, सामान्य जनतेला अधिकाधिक दीन बनवीत असतात. उपक्रमशीलता थिजवून टाकीत असतात ! जिथे जाती, पाती, धर्म, पंथ, आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठा, कुटुंबसंस्था, अशा कुठल्या ना कुठल्या शब्दाला निराळा अर्थ आहे तिथे सारे अर्थजीवन आणि राजसत्ता वशिलेबाजी व लांचलुचपतीने पुरी भारलेली असावी ही गोष्ट अपरिहार्यच !

श्री. मिर्डाल यांनी आपल्या ग्रंथात या लांचलुचपतीचे साकल्याने विश्लेषण केले आहे. अविकसित देशात भरमसाठ प्रमाणात लांचलुचपत बोकाळली आहे ही गोष्ट प्रत्येकाला ठाऊक आहे. पण या सत्य परिस्थितीची चर्चा करणे निषिद्ध मानले जाते. पाश्चिमात्य अर्थतज्ज्ञ काही वेळा या लांचलुचपतीचा आपल्या लिखाणात धावता उल्लेख करतात. पण कदाचित् कामे झटपट करणारा तो 'गतिद-पैसा' (Expediaring money) म्हणून तो त्यांना योग्य खर्च वाटत असेल वा 'नॉन इकॉनॉमिक फॅक्टर' म्हणून ती विश्लेषणबाह्य गोष्ट ठरत असेल ! अमेरिकेतील पोलाद उद्योगात चाललेला दीर्घकाळ संप मिटविण्यात पुढाकार घेतलेल्या सेक्रेटरीवर पैसे खाल्ल्याचा आरोप, खुद्द प्रे. ट्रुमन यांच्याजवळ कुणी केला तेव्हा ते म्हणे म्हणाले, 'आय् नो ही इज् ए फाइव्ह पर्सेण्टर !' पण लांचलुचपतीकडे असे दुर्लक्ष अमेरिकेसारख्या श्रीमंत देशाला एकवेळ परवडेलही. पण भारतातही पुष्कळ लोकांना लांचलुचपत ही सार्वकालिक बारमहा गोष्ट वाटावी आणि त्यांनी 'हे असे चालणारच' असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करावे, त्यातून काळ्या पैशाची प्रति-अर्थव्यवस्था उभी झाली आणि वैध अर्थव्यवस्थेचे सगळे प्रयत्न ती उधळू लागली तरी भारतीय शासनाला, अधिकारी वर्गाला वा सामान्य जनांना त्याचे विशेष काही वाटू नये, ही गोष्ट महाभयंकर आहे ! अनेकांना असेही वाटते की, लांचलुचपत म्हणजे विरोधी पक्षीय नेत्यांनी सरकारवर कोरडे ओढण्यासाठी वापरला जाणारा एक चाबूक आहे !

लांचलुचपत 'इकॉनॉमेट्रिक्स'मध्ये बसत नाही म्हणून अर्थतज्ञांनी तिचे

[ पष्ठ ५६ वर ]

# आलेपाक

■ मुंबईत, गवताच्या तुटवडयामुळे, बिनसरकारी दुधाचे भाव भडकण्याचा संभव आहे, अशी एक बातमी आहे.

ही बातमी वाचून मला दोन शोध लागले : एक, मुंबईतल्यादेखील गाई-म्हशी गवत खातात; आणि दोन, दुधाचे भाव भडकण्यासाठी काही कारणही लागते !

■ लोकलसच्या टपावर बसून प्रवास करू नये असा इशारा पश्चिम रेल्वेने उतारूंना दिला आहे.

हा इशारा खुद्द टपावरच लिहून ठेवल्यास उतारूंना त्याप्रमाणे वागणे सोयीचे होईल, असे आम्हाला वाटते.

लोकलसच्या टपावर उभे राहून प्रवास करू नये असा इशारा पश्चिम रेल्वेने दिला असता तर कदाचित उतारूंनी तो मानलाही असता.

■ 'नवशक्ती'चे नाटयपरीक्षक श्री. शशिकांत नार्वेकर यांनी श्री. जितेंद्र अभिषेकींची एक मुलाखत घेतली. तिच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे. 'अभिषेकी हे स्वतःबद्दल किंवा स्वतःच्या संगीतरचनेबद्दल बोलायला नेहमीच नाखूष असतात.'

स्वतःबद्दलच कशाला; दुसऱ्याबद्दल-देखील बोलायला अभिषेकी नाखूष असतात आणि यदाकदाचित् बोललेच तर पटकन बोलणे मागे घेतात.

■ 'बांगडा' हा भारताचा राष्ट्रीय मासा होऊ शकेल असे मत गोव्यातील राष्ट्रीय सागर-संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एन्. के. पणिक्कर यांनी व्यक्त केले आहे.

तसे झाले तर भारताला 'बांगडा देश' म्हणायला हरकत नाही शेजारी 'बांगला देश' आहेच.

■ म्हैसूरचे राज्यपाल श्री. मोहनलाल सुखाडिया सध्या आपले वजन कमी करण्याच्या प्रयत्नात आहेत.

पण वजन कमी करूनच सुखाडियांची म्हैसूरचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली होती, असे मला पक्के आठवते !

■ एका आरोग्यविषयक सदरात म्हटले आहे : 'तुरट पदार्थ खाण्याची इच्छा नैसर्गिक आहे. लोकमान्य टिळकांना तुरट खाण्याची सुपारीची सवय होती.'

लोकमान्य टिळक म्हणे नेहमी म्हणायचे, की 'सुपारी खाणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि ती मी खाणारच !'

गंगाधर गाडगीळांनी आपल्या टिळकांवरील चरित्रात्मक कादंबरीत 'दुर्दम्य' टिळकांना (टिळकांना आता

, लोकमान्य ' कोणी म्हणत नाही.) इतकी सुपारी. चारली आहे, की गाडगीळांची एखादी छुपी पानाची गादी असावी अशी माझी समजूत झाली.

■ बॉंबे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने नुकतीच मुंबईतील कावळ्यांची नेमकी मोजदाद केली.

एकूण संख्येमधून उडणारे कावळे वजा केले असता मुंबईतील टी 'काक'ांची नगद संख्या अचूक मिळायला हरकत नाही.

■ मुंबईत केलेल्या विद्यार्थ्यांच्या एका तपासणीत, आपल्या प्राध्यापकांना तळमळ नाही, अशी तक्रार त्यांनी केली आहे.

प्राध्यापक म्हणतात : ' आहे या ग्रेडमध्ये तळमळ परवडत नाही ! '

■ ' सांस्कृतिक मुंबई ' या सदरात श्री. विनय धुमाळे लिहितात : ' मुंबईत, सकाळच्या गर्दीत तर वयस्क माणसांना तीन-तीन गाड्या सोडाव्या लागत आहेत. '

काही तरुण माणसे गाडी पकडण्याच्या प्रयत्नात वयस्क झालेली पाहिली आहेत आम्ही. □

## पांढरा हत्ती

एखाद्या महाखर्चिक पण विनउपयोगी गोष्टीला इंग्रजीत ' व्हाइट एलेफंट ' असे म्हणतात. इंग्रजीतील अनेक शब्दवाक्प्रयोग मराठीने स्वीकारले आहेत. ' व्हाइट एलेफंट ' हा असाच एक शब्द. त्याचा ' पांढरा हत्ती ' हा भाषांतरित पर्याय मराठीत जवळजवळ रूढ झाला आहे. पण मूळ इंग्रजीत तरी हा शब्दप्रयोग कसा आला ?

तामीळनाडूमधील मुदुमलाई अभयारण्यात आपण एक पांढऱ्या हत्तीचे वछडे पाहिले असा दावा एका अरण्याधिकाऱ्याने केला आहे. त्याच्या दाव्यावर विश्वास बसणे कठीण आहे. कारण भारतात आत्तापर्यंत असा हत्ती पाहिल्याचे कोठेही नमूद झालेले नाही. नेमकेपणाने बोलायचे तर असे हत्ती जगात इतरत्रही कोठे नाहीत. कंबोडिया आणि थायलंडमध्ये भुरक्या रंगाच्या हत्तींची एक जात आढळते. सर्वसाधारणपणे या जातीतील हत्तींनाच पांढरे हत्ती मानण्याची प्रथा आहे.

हे भुरके हत्तीसुद्धा दुर्मिळ आहेत. पकडल्यावर त्यांची राजविलासी बडदास्त राखण्यात येते. त्यांच्यासाठी खास प्रकारची जागा तयार करावी लागते. त्यांचे खाणेपिणेसुद्धा सर्वसामान्य करड्या रंगाच्या हत्तींपेक्षा वेगळे आणि श्रीमंती असते. ' पांढरा हत्ती ' हा शब्दप्रयोग या तैनातीवरून उद्भवला असावा असे वाटते.

या संदर्भात एक आख्यायिकाही सांगितली जाते. पांढऱ्या हत्तींची विशेष प्रकारे काळजी घ्यावी लागत असल्यामुळे आणि ती काळजी घेणे हे महाखर्चिक काम असल्यामुळे, सयामचे राजे नाठाळ व नावडत्या दरबारी मंडळींना

पांढरे हत्ती नजर करत असत. या हत्तींची बडदास्त ठेवताना बिचारे टेकीला येत. यथाकाल पोकळ प्रतिष्ठेच्या विनउपयोगी गोष्टीला 'पांढरा हत्ती' म्हटले जाऊ लागले असावे.

जाता जाता एक गंमतीची सत्यकथा सांगायला हरकत नाही. १९५० साला-पूर्वी, कधीतरी, कंबोडियाच्या राजाने, त्या वेळचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हॅरी ट्रुमन यांना पांढऱ्या हत्तीचे एक बछडे भेट म्हणून पाठवण्याचे निश्चित केले. या बछड्याला आणि त्याच्या माहुताला अमेरिकेला पाठवण्यात अनेक तांत्रिक आणि व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या. अखेर अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटसारख्या मातबर पदाधिकाऱ्याला मध्यस्थी करावी लागली. बोटीतून हे बछडे मार्गस्थ झाले. परंतु प्रवासात, केप टाऊन येथे, ते मृत्यू पावले.

◻

## हिंदु इंडिया ? नव्हे निधर्मी भारत

पाश्चिमात्य वर्तमानपत्रे भारताचा उल्लेख नेहमी 'हिंदु इंडिया' असा का करतात, प्रभूला ठावे. कारण आम्ही तर आम्ही हिंदू नाही, असे सारखे आक्रोशून सांगत असतो. आम्ही कट्टर आणि कडवे निधर्मी आहो. (खरे तर बाटगेसुद्धा; कारण निधर्मी 'धर्म' आम्ही स्वातंत्र्योत्तर काळात स्वीकारला आहे.) त्यामुळे पाश्चिमात्य वर्तमान-पत्रांच्या खोडसाळपणाचा आम्हाला राग येणे स्वाभाविक आहे. पण राग आला तरी करणार काय? बोलणाऱ्याचे पाश्चिमात्य तोंड थोडेच धरता येते?

पण परवा 'न्यूजविक' साप्ताहिकात पाश्चिमात्यांचा मुखभंग करणारे एक बिनतोड पत्र वाचले आणि बरे वाटले. भारताच्या निधर्मीपणाचे महत्त्व न जाणल्याबद्दल साप्ताहिकाच्या संपादकांना कानपिचक्या देऊन पत्रलेखक-महाशय पुढे लिहितात: 'नुकत्याच झालेल्या पाक-भारत संग्रामात भारताचे सरसेनापती **पारशी** होते; चीफ ऑफ द एअर स्टाफ **ब्राह्मो समाजी** होते; चीफ ऑफ नेव्हल स्टाफ **हिंदु** होते; दिल्लीचे रक्षण करणाऱ्या आग्रा हवाई-तळाचे प्रमुख **मुसलमान** होते; कराचीवर तोफा डागणाऱ्या अरबी समुद्रातील नौदलाचे कर्णधार **ख्रिश्चन** होते; बांगला देश मुक्त करणाऱ्या पूर्व आघाडीवरील सेनेचे नेते **शीख** होते. भरीत भर म्हणजे (परंपरेने) **अस्पृश्य** मानले गेलेले गृहस्थ भारताचे संरक्षण मंत्री होते; आणि आपण **नास्तिक** आहो असे निकराने सांगणाऱ्या बाई भारताच्या पंतप्रधान होत्या.'

आता तरी भारताच्या बिनदिखाऊ निधर्मीपणाची त्या पाश्चिमात्य वर्तमान-पत्रवाल्यांना खात्री वाटेल काय? वाटेल, वाटेल. इतके झाल्यावरही खात्री न वाटायला ते थोडेच जनसंघवाले आहेत?

◻ ◻ ◻

# कहाणी एका फसलेल्या संपाची....

चंद्रकांत अंबाडे

आणि १४ सप्टेंबरला सायंकाळी मद्रास रेडिओ स्टेशनवरून जाहीर करण्यात आले...रेल्वेच्या सदर्न झोन मधील लोको रनिंग स्टाफचा संप मागे घेण्यात आला आहे. कामगारांनी २४ तासांच्या आत कामावर हजर व्हावयाचे आहे..बातमी ऐकून जनतेस जितका आनंद झाला असेल, त्यापेक्षा अधिक संपवाल्यांना झाला नाही तरच नवल! दुसरं तिसरं काही नाही. मुंबईच्याच संपाची ही खास मद्रासी आवृत्ती ठरली. नाही म्हणायला १५ दिवसात लोकांचे जे हाल झाले, त्याला मात्र तोड नाही. काहीही पुरेशी पूर्व सूचना न देता, एक तारखेस मध्यरात्रीपासून सारे ड्रायव्हर्स कोळशेवाले, तेलवाले, शंटर्स संपावर गेले, आणि हां हां म्हणता अख्ख्या दक्षिण भारतातील रेल्वेची यंत्रणा विस्कळीत झाली.

फटका बसला मद्रास, बंगलोर, त्रिचनापल्ली, कोईमतूर, अशा मुख्य मुख्य शहरांना. ह्या पंधरा दिवसात टाईमटेबल्स आणि फलाटावरील घड्याळे यांना आराम होता. कोणती गाडी कधी सुटेल अन् येणारी गाडी कधी येईल, किंबहुना येईलच की नाही ह्याची खात्री कुठलाही स्टेशनमास्तर देऊ शकत नव्हता. फलाटावर प्रवाशांची प्रचंड तोबा गर्दी, कॅन्टीन्समधील चहा-सह सारे कधीच संपलेले, वर्तमानपत्रे अन् पार्सलांचे प्रचंड ढीग साचलेले हे सर्वच स्टेशन्सवरील दृश्य! दिवसभरात कधीमधी एखादी अप किंवा डाऊन गाडी येई...द्राक्षाच्या घडाप्रमाणे लोंबकळत आणि टपावर बसून लोक जीवावर उदार होत. ती गाडी अधल्या मधल्या प्रत्येक स्टेशनावर थांबे. मग सहज कुणीतरी बोर्ड पाही अन् म्हणे 'अरे, ही तर बॉम्बे-मद्रास मेल आहे. ही तर सकाळी पाचाला मद्रासला पोहोचते!' त्यावर दुसरा कुणीतरी म्हणे 'आत्ता दुपारी बाराला इथंच आहे, म्हणजे संध्याकाळच्या पाच ला नक्की मद्रासला जाईल!' तेवढ्यात कुणीतरी 'कार्यकर्ते' इंजीनात शिरून त्या 'संपद्रोही' ड्रायव्हरला 'चार शब्द' सांगून पाहात. इंजीनात ठेवलेला संगीनधारी पोलीस बिचारा बाहेरचं सृष्टिसौंदर्य पाहण्याचा आव आणी.

पंधरा दिवसांच्या ह्या काळात तुरळी असेल तर फक्त मालवहातुक! लोकांनी प्रवास रद्द केले, नाहीतर बसेसनी गेले. रोज लोकलसनी जाणाऱ्या पासवाल्यांनी चार तास लेट जावे व दोन तास आधीच सुटावे...गाडी पकडण्यासाठी.

मद्रासच्या पॉवर हाऊसचा कोळशाचा साठा संपत आला, केरळमधील तांदूळ केवळ ३ च दिवसापुरता होता आणि भाव कडाडलेले होते, म्हैसूर-हॉस्पेट-बेल्लारी भागातील खाणीमधून काढलेल्या खनिजांचे (ओअर ढिगारे) जागजागी पडून होते. यार्डामध्ये जिथे जिथे मोकळी जागा म्हणून दिसली तेथे तेथे ढीग लावले होते. एरव्हीच दररोज १०,००० टन खनीज काढले जाई, त्यापैकी रेल्वे फक्त नऊ हजारच टन उचलू शके. दुष्काळात तेरावा महिना, खरोखरच दुष्काळानेच आणला. दुष्काळी काम योजनेनुसार खाणीवर जादा मजूर मिळाल्याने रोजचे एकूण उत्पादन १६००० टनांपर्यंत वाढले तर उठाव नवावरून तिनावर आला! तो सुद्धा टेरिटोरियल आर्मीमधील सैनिक, रिटायर्ड लोकांना पुन: नेमणुका दिल्यामुळे आणि थोड्याफार 'संपद्रोही' मंडळींमुळे!

मुंबई संपातील 'बोनस' शब्दाप्रमाणेच इथेही 'जादा काम' हा फसवा शब्द ठरला. संपवाल्यांच्या जनरल सेक्रेटरीने मद्रासला मुख्य मंत्र्यांना भेटून सांगितले, 'धावत्या गाड्यांमधील ड्रायव्हर, कोळसेवाल्यांना बारा बारा तासांची ड्यूटी पडते, जेवणाची सुटी मिळतच नाही! कामगारांवर अमानुषपणे हा अत्याचार आहे!' त्याचप्रमाणे इतरही अकरा अशा डझनभर मागण्या होत्या...केव्हा, संपाच्या पहिल्या दिवशी. आठव्या दिवशी त्यापैकी तीनच मागण्या उरल्या. कोणत्या ठाऊक आहे? अटक झालेल्यांची सुटका, त्यांचेवर कारवाई न करण्याचं आश्वासन आणि सर्व्हिस ब्रेक न करण्याचं वचन. वास्तविक ह्यांना काही मागण्या म्हणता येत नाहीत. १९७० मध्ये जो संप झाला होता, त्यामध्ये भाग घेतलेल्यांच्या सर्व्हिसेसमध्ये ६ दिवसांचा ब्रेक धरलेला आहे, ही आठवण ताजी होती ना! तमीळनाडूच्या मुख्य मंत्र्यांनी पंतप्रधानांना तार करून, कामगारांची सहानुभूती जिंकली असो वा नसो, पण जनतेची मात्र ते गमावून बसले. कारण रेल्वेमंत्र्यांचा मुक्काम मद्रासलाच होता. त्यांनी तात्काळ ठणकावले, 'बाहेरच्यापैकी कुणाचीही लुडबूड आम्हांला नको आहे' व त्याच दिवशी सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून ड्रायव्हर्सचे पगार प्रसिद्ध झाले! ते वाचून तर सामान्य जनतेचे डोळेच पांढरे झाले आणि संपवाले जनतेची उरलीसुरली सहानुभूतीही गमावून बसले. संपामधील जीव संपला तो इथेच. सध्या रेल्वेड्रायव्हर्स वगैरे रनिंग स्टाफला मिळणारा पगार पहा तर खरं. (पृष्ठ २० वरील तक्ता पहा)

आता, जरा विचार केला तर ध्यानात येईल की, डबल ग्रॅजुएट प्रोफेसर, किंवा गॅझेटेड सरकारी ऑफिसरलाही ड्रायव्हरइतका पगार मिळत नाही. इंजीनात कोळसा भरणाऱ्या मजुराइतका पगार, ग्रॅज्यूएट अप्पर डिव्हिजन कारकुनास मिळत नाही नी हेडक्लार्कला सुद्धा! ह्यामुळे जादा काम पडते ह्या तक्रारीची दुसरी बाजू प्रकाशात आली की, त्याचा ओव्हरटाईमही

| हुद्दा | बेसिक पगाराचे स्केल | दरमहा प्रत्यक्ष हातात |
|---|---|---|
| ड्रायव्हर 'ए' ग्रेड | ३३०–४२५ रुपये | १३१५ रु. फक्त (?) |
| ,, 'बी' | २१०–३८० ,, | ११११ ,, |
| ,, 'सी' | १५०–२४० ,, | ९१५ ,, |
| शंटर 'ए' ग्रेड | १३०–२०० ,, | ८०८ ,, |
| ,, 'बी' | १३०–१५८ ,, | ६९८ ,, |
| फायरमन 'ए' | १२५–१५५ ,, | ५८० ,, |
| 'बी' | १००–१३० ,, | ६३१ ,, |
| 'सी' | ८०–९५ ,, | ४४८ ,, |
| डिझलमन तेलवाला | १२५–१५५ ,, | ५८६ ,, |

भरपूर कमविता त्याचं काय? ह्या मंडळींना 'रनिंग अलावून्स' दर १०० किलोमिटर्स ना ७.९० रुपये, म्हणजे जवळ जवळ आठ रुपये ह्या हिशोबाने तर मिळतोच पण दररोजचा हिशोब किमान १२० किलोमिटर्स इतका धरण्यात येतो. म्हणजे एकाद्या ड्रायव्हरने एखादा मैल जरी इंजिन चालविले असो नसो त्याला त्या दिवसाचा नऊ रुपये पस्तीस पैशांचा भत्ता मिळतो. त्या शिवाय रात्रीबद्दल खास भत्ता, गाड्या लेट झाल्यावर ओव्हरटाईम, धावत्या गाडीमध्ये जेवणाच्या सुट्टीच्या वेळाइतका स्पेशल भत्ता, घाटातील कामाचा वेगळा भत्ता, हे सारे भत्ते निराळेच. मग का नाही पगार हजारात मिळणार? शिवाय हे सारे भत्ते प्रॉव्हिडंट फंडात धरले जातात. त्याचा फायदा असा की, तितक्याला तितकी स्वत:ची रक्कम घालण्यास रेल्वे बांधील असते.

भारतीय रेल्वेचे एकूण भांडवल सुमारे ३३२१ कोटींचे आहे व गेली पाचवर्षे भरमसाठ दरवाढ करूनही रेल्वेला सतत तोटाच येतो आहे. रेल्वेच्या एकूण खर्चापैकी ७०% खर्च केवळ पगार व इंधनावर आहे. १९६६ मध्ये पगारापोटी ३१० कोटी ४० लाख पुरे होते, तर १९७१ पर्यंतच्या काळात ४२० कोटी ८० लाखापर्यंत पगाराचा आकडा फुगला. भारतीय रेल्वे पैकी फक्त सेंट्रल, साऊथइस्टर्न आणि वेस्टर्न ह्या तीनच रेल्वे फायद्यात आहेत. पण एकूण रेल्वे बजेटांत सदर्न, साऊथसेंट्रल ह्यांच्या तोट्यामध्ये तो फायदा केव्हाच वजा होऊन जातो. रेल्वेचा फायदा वाढविण्यास आज जर मुख्य गरज असेल तर कार्यक्षमता वाढविण्याचा आणि नेमके हेच तेवढे सोईस्करपणे दुर्लक्षिले जाते व दरवर्षी भाडेवाढ आहेच. आता हेच पहाना. इकडे दक्षिणेत सर्व रेल्वेव्यवस्था विस्कळीत झालेली होती. त्याचवेळी रेल्वेमंत्री, प्रधानमंत्री, सर्वांचा मुक्काम कन्याकुमा-

[ पृष्ठ ४८ वर ]

मनोविकारशास्त्र

# मनोव्यापार

डॉ. प्रकाश श्री. साठये

मनोव्यापारांच्या बाबतीतलं वैशिष्टय असे की वस्तुस्थितीपासून ते केव्हा दूर जायला लागतात हे ओळखणे अवघड होते. विशेषत: वृथासमर्थन (Rationalisation) आणि प्रक्षेपण (Projection) यांच्या बाबतीत तर ही सीमारेषा अतिशय पुसट असते. वृथा समर्थन आणि प्रक्षेपण हे बऱ्याचवेळा एकमेकांच्या हातात हात घालून असतात कारण प्रक्षेपणाचा अवलंब करूनच वृथासमर्थन केलं जातं.

वृथासमर्थन (Rationalisation) अपयशामुळे निर्माण होणारं दुःख किंवा निराशा यांची धार बोथट करण्यासाठी अथवा आपण करीत असलेली गोष्टच कशी योग्य किंवा बरोबर आहे हे पटवून देण्यासाठी वृथासमर्थनाचा उपयोग केला जातो. आलेल्या अपयशाचं खापर दुसऱ्यावर फोडून माणूस मोकळा होतो. 'परीक्षकांचे न् माझे बरे नसल्यामुळे मी नापास झालो' असे म्हणणारे कितीतरी विद्यार्थी आपल्याला दिसतात. 'नाचता येईना अंगण वाकडे, स्वयंपाक जमेना ओली लाकडे' असा शेरा वृथासमर्थन करणारावर मारला जातो. आपल्यातल्या उणीवेचे प्रक्षेपण दुसऱ्या सजीव किंवा निर्जीव गोष्टीवर करून माणूस वृथा समर्थन करतो.

आपण केलेली किंवा आपल्या बाबतीत घडलेली गोष्ट कशी योग्य आहे याचे समर्थन करण्याचे कारण न्यूनगंडापासून मुक्त रहाणे हा हेतू असतो. एखादी अपेक्षित गोष्ट मिळाली नाही की त्यामुळे निर्माण होणारे दुःख कमी करण्याचा जो प्रयत्न होतो त्याचे दोन मार्ग असतात. एक म्हणजे हे असेच व्हायला हवे होते आणि असे झाल्यामुळे माझा शेवटी फायदा होणार आहे. (पराजयानंतरचा अंतिम विजय आपलाच आहे या घोषणेची आठवण होते ना ?) असे समजून 'देव करतो ते बऱ्यासाठी' असे माणूस म्हणतो. दुसरा मार्ग म्हणजे न मिळालेली गोष्ट कशी अयोग्य, वाईट किंवा तोटयाची होती हे माणूस दुसऱ्याला समजावून सांगण्याचा आटापिटा करतो. लोक म्हणतात, 'कोल्ह्याला द्राक्षं आंबट !'

हे समर्थन वृथा असल्याचे खालील गोष्टींवरून ओळखता येतं. पहिली म्हणजे स्वत:च्या कृत्याची योग्यता पटवण्यासाठी माणूस एकामागून एक मुद्दे शोधायला लागतो. दुसरी म्हणजे हे ओढूनताणून आणलेले मुद्दे पटवताना त्यातली विसंगती त्यांच्या लक्षात येत नाही. तिसरी अशी, की ऐकणाऱ्यानं ती विसंगती दाखवून दिली किंवा एखादा

मुद्दा खोडायचा प्रयत्न केला की तो एकदम आणि अतिशय चिडतो.

वृथा समर्थन आणि असत्य कथन यातला फरक एवढाच की, असत्य हे जाणून बुजून, समजून उमजून बोललं जातं, तर समर्थन अजाणतेपणाने आणि स्वभावाचा एक भाग म्हणून होतं. खोटं बोलणारा माणूस दुसऱ्यांना फसवतो तर वृथा समर्थक स्वत:ला फसवतो.

प्रक्षेपण (Projection) माणसाचं, स्वत:चे न्यून, चुका किंवा दुष्कृत्याबद्दल दुसऱ्याला दोषी धरणे हा झाला प्रक्षेपणाचा एक प्रकार? दुसरा म्हणजे स्वत:च्या अमान्य होणाऱ्या भावना, इच्छा, आकांक्षा माणूस दुसऱ्यावर ढकलतो. कुणा तरुणाला एखादी मुलगी आवडली, ती त्याच्या मनात भरली तरी आपलं तिच्यावर प्रेम आहे ही गोष्ट तो स्वत:जवळसुद्धा कबूल करत नाही. उलट 'ती मुद्दाम मी जातो त्या रस्त्याने जाते, माझ्याकडे वारंवार वारंवार पहाते. काही वेळा हसतेसुद्धा एकूण ती माझ्यावर खूष आहे' असेच तो समजतो न् वेळ पडली तर इतरांना सांगतोही!

प्रत्येक वेळेला वाईटच गोष्टी सजीव किंवा निर्जीव गोष्टींवर प्रक्षेपित केल्या जातात असे नाही. शनवारवाड्यावर कुणा मोठ्या व्यक्तीच्या निधनानिमित्त शोकसभा चालली आहे. पावसाळ्याचे दिवस आहेत. आभाळ भरून आलेले आहे अशा वेळेला मान्यवर वक्ते बोलायला सुरुवात करणार इतक्यात पावसाचे थेंब पडायला लागतात. वक्ते म्हणतात, 'पहा! ते आपल्यातून गेले त्यांचे आपल्यालाच नाही तर परमेश्वराला देखील दु:ख झालं आहे आणि तो अश्रू ढाळतो आहे.' समजा ही शोकसभा नसून स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवाचा समारंभ आहे तर वक्ते म्हणतील, 'आज आपल्या आनंदात आभाळदेखील सहभागी होऊन आनंदाश्रूंचा वर्षाव करीत आहे.' संध्याकाळी मोकळ्या हिरवळीवर पडून आभाळाकडे तोंड करून ढगांकडे पहा. तुम्ही मनात आणाल तो आकार ढगांना आलेला तुम्हाला दिसेल.

वस्तुस्थिती नाकारणे Denial of reality) आपल्यातल्या किंवा आपल्या आवडत्या व्यक्तीच्या न्यूनाची दखल माणूस घेत तरी नाही किंवा त्या न्यूनाचे अस्तित्व नाकारतो. मंदबुद्धी मुलाची आई म्हणते, 'या काळात बुद्धिची हळूहळू वाढ होणारी एक जात सापडली आहे. माझा मुलगा त्या जातीतला आहे.' त्याला बुद्धी कमी आहे आणि ती तशीच कमी रहाणार आहे हे सत्य ती नाकारते. अभिमानी आईवडलांना त्यांच्या मुलांमधले दोष दिसत नाहीत ते यामुळेच. बऱ्याच वर्षांनी झालेले मूल छोट्याशा आजारानंतर मरण पावलं तर आईला ते पटत नाही. ती म्हणते, 'तुम्ही खोटं सांगताहात! पहा कसा शांत झोपलाय तो' गडकऱ्यांच्या 'राजहंस माझा निजला' या कवितेत हीच भावना दिसते.

वृथासमर्थन, प्रक्षेपण आणि वस्तुस्थिती नाकारणं या गोष्टींचा उपयोग

तात्पुरता चांगला होत असला तरी त्या माणसाला वस्तुस्थितीपासून दूर नेतात हे विसरून चालणार नाही. या गोष्टींच्या अतिरेकी वापरामुळेच मनुष्याला निरनिराळे भ्रम (delusions) निर्माण होतात.

प्रतिक्रिया घटन (Reaction formation)– समाजाला अमान्य होणाऱ्या किंवा स्वतःला न चालणाऱ्या आपल्या इच्छाआकांक्षांचं नसतं निरोधन करून माणूस थांबत नाही. तर त्यांच्यापुढे जाऊन त्या इच्छेच्या, आकांक्षेच्या बरोबर विरुद्ध दृष्टिकोन किंवा प्रवृत्ती तो निर्माण करतो. विशेषतः लैंगिक इच्छांची वासलात तो या पद्धतीनं लावतो. भीतीच्या बाबतीतही असं प्रतिक्रीया घटन होतं. भीतीऐवजी विरुद्ध अशी बेफिकीरवृत्ती त्याच्यात निर्माण होते. तो म्हणतो, 'वाघ म्हटले तरी खाणार न् वाघोबा म्हटलं तरी खाणारच मग सरळ वाघ्या म्हणावं,' आणि बेदरकारपणे वागतो. कोपऱ्यात गाठलेलं मांजर कोंडणाऱ्या माणसाच्या अंगावर चवताळून झेप घेतं ते या प्रतिक्रिया घटनामुळेच.

प्रतिगमन (Regression) –माणूस परिस्थितीच्या कोंडीत सापडला किंवा पकडला गेला की किंकर्तव्यमूढ होतो. त्याचा स्वतःवरचा ताबा सुटतो आणि तो बालिशपणाने वागू लागतो. अकांडतांडव करतो. अपरिपक्व व्यक्ति आणि विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत असं प्रतिगमन अधिक पहायला सापडतं. या प्रतिगमनामुळे तात्पुरती का होईना परिस्थितीच्या कोंडीतून माणसाची सुटका होते.

पर्यायीकरण (Substitution) – आपली इच्छा किंवा महत्त्वाकांक्षा पुरी होणं आपल्या सामर्थ्याच्या पलिकडलं आहे असं लक्षात आलं की माणूस पर्याय शोधतो आणि आपलं पर्यायी साध्य पूर्ण करतो. ज्यांना B. E. किंवा M. B. B. S. होणं शक्य नसतं ते D. E. किंवा B. A. M. S., D. A. S. F. होतात आणि अनुक्रमे इंजिनिअर किंवा डॉक्टर होण्याचं आपलं ध्येय गाठतात. आपल्या महत्त्वाकांक्षेला, योग्य असा आणि आपल्या आवाक्यातला पर्याय शोधण्याचं पथ्य जे पाळतात त्यांच्या वाटयाला वैफल्याचं दुःख (frustration) क्वचितच येतं. 'Not failure, but low aim is crime' असं म्हणणा-यांत failure पचवायची ताकद असावी लागते.


उदात्तीकरण (Sublimation) – एखादी गोष्ट आपल्या नशीबात नाही असं आढळून आलं की वस्तुस्थिती न नाकारता माणूस त्या गोष्टीच्या अभावावर विधायक रीतीने मात करू शकतो. वस्तुस्थिती मान्य केल्यावरच उदात्तीकरणाला सुरुवात होते. मूल न होणारी जोडपी दत्तक घेतात किंवा इतर नातेवाईकांची मुलं सांभाळतात. अशा स्त्रिया लहान मुलांच्या शाळेत किंवा अनाथाश्रमात हौसेनं काम करतात. प्रौढ कुमारिका स्त्रियांच्या निरनिराळ्या संस्था चालवण्यात हिरीरीने भाग घेतात आणि त्यांच्या कल्याणाला हातभार लावतात. उदात्तीकरणाची

उदाहरणं दुर्दैवानं समाजात फार कमी पहायला मिळायला मिळतात.

विभक्तिकरण (Dissociation) – असह्य किंवा मनस्ताप निर्माण करणाऱ्या गोष्टीला तोंड देताना माणूस विभक्तीकरणाचा उपयोग करतो. होणारी वाईट गोष्ट आपल्या बाबतीत घडत नसून दुसऱ्या कुणाच्या बाबतीत घडते आहे असं समजून माणूस भावनिकदृष्टचा स्वतःला वेगळा बाजूला काढतो आणि त्या गोष्टीमुळे निर्माण होणारी भावनिक आंच तो कमी करतो. एक कंत्राटदार आहेत, कामाच्या निमित्तानं निरनिराळ्या साहेबांच्या हाताखाली त्यांना वावरावं लागतं. कामात चुका झाल्या की ऑफिसात बोलावून त्यांची यथेच्छ हजेरी घेतात, वाटेल तसं बोलतात. या गोष्टीचं त्यांना विशेष वाटत नाही. ते सांगतात 'ऑफिसात शिरलो की साहेब आता मला बोलणार नसून त्याच्यासमोरच्या टेबलाला बोलणार आहेत आणि ते ऐकण्यासाठी मला बोलावलं आहे असं मी समजतो. मनाविरुद्ध वागणारा, वाया गेलेला मुलगा 'तो आम्हाला मेला आणि आणि आम्ही त्याला मेलो' असं जाहीर करून, त्याला हाकलून देऊन आईबाप त्याच्यापासून होणाऱ्या मनस्तापापासून मुक्त होतात. ते असं करू शकतातही. भावनिक विभक्तिकरणाची (emotional insulation) ची किमया असते. आईला असं करणं जास्त जड जातं ही गोष्ट वेगळी !

या विभक्तिकरणाच्या अतिरेकातून मनुष्याचे सुष्ट व दुष्ट भाग वेगळे होऊन Dr. Jackyll and Mr. Hyde सारखी एकाहून अधिक व्यक्तिमत्त्वे एकाच शरीरात निर्माण होऊ शकतात. सुदैवानं अशी उदाहरणं अतिशय थोडी सापडतात.

◻ ◻ ◻



# पराजय

ब. मो. पुरंदरे

महाराजांनी डिचोलीहून आपलं सर्व सैन्य, म्हणजे अकरा हजार घोडेस्वार आणि एक हजार पायदळ नारव्याला आणवलं. त्यांनी नारव्यात छावणी ठोकली. श्रीसप्तकोटीश्वराचं मंदिर बांधण्याचा त्यांनी मनसुबा पक्का केला. खरं म्हणजे हा त्यांचा मनसुबा फार पूर्वीच पक्का झाला होता. ते मंदिर बांधणार होते. परंतु मंदिर बांधणं हाही फिरंग्यांच्याविरुद्ध ठरविलेल्या गनिमी काव्याचाच एक भाग होता. मंदिराचं बांधकाम चालू असताना महाराज स्वत: या सर्व सैन्यानिशी नारव्याला छावणी ठोकून राहणार होते. मंदिराचं बांधकाम चालू असताना स्वत: महाराजांना राहण्याची काय आवश्यकता? अन् सोबत बारा हजार सैन्य? कशासाठी?

गनिमी काव्यासाठी! प्रथम महाराज रवळो देसायाच्या मुलुखात घुसले. तो पळाला गोव्याला. म्हणून त्याच्या पाठ-

लागाचं निमित्त करून ते गोव्यात घुसले. नंतर गव्हनेराने तह केला. त्या तहाने महाराजांनी गोव्यावरची चढाई थांबवली आणि गोव्याच्या गव्हनेराला त्यांनी बेसावध बनवले. या तहानंतर लगेच महाराजांनी आपला एक वकील गोव्यात वकिलात उघडून मुक्कामाला ठेवला. आपला वकील गोव्यात ठेवणं हाही या गनिमी काव्यातलाच एक भाग ! गोव्याच्या गव्हनेराला वाटले, की आता आपला आणि शिवाजीराजांचा तह झाला, त्याची कायम वकिलात इथं आली. आता तंटा मिटला !

महाराज नारव्याला मुक्कामाला असताना एका बाजूला सप्तकोटीश्वराचं मंदिर बांधण्याच्या उद्योगाची पूर्वतयारी चालू झाली होती. गवंडी, पाथरवट, मजूर, लोहार, सुतार वगैरे माणसं कामं करीत होती. अन् त्याच वेळी महाराज आपल्या जिवलग सहकाऱ्यांसह गोवा एका घासात कसा गिळायचा याची खलबतं करीत होते. खरोखरच एक विलक्षण राजकारण श्रीसप्तकोटीश्वराच्या सान्निध्यात, त्या गर्द गंभीर झाडीत आकार घेत होतं. महाराजांच्या डोक्यात विचार चालू होता त्याचाच. गोवा, गोवा ! फिरंगी, फिरंगी !

महाराजांनी पुढचा डाव पक्का केला. डाव असा, मंदिराच्या बांधकामाचं निमित्त करून महाराजांनी नारव्याला सैन्यासह मुक्काम करायचा आणि रोज अगदी गुपचूप निरनिराळ्या मार्गांनी आपले मराठे सैनिक गोव्यात सोडायचे. अर्थात मराठे वेषांतर करून, फिरंगी मुलुखात प्रवेश करतील आणि गुप्तरूपाने वावरत राहतील. अनेक तऱ्हेची सोंगंढोंगं करून रात्री-अपरात्री ही माणसं गोव्यात मोक्याच्या जागी वावरत राहतील. याच वेळी अण्णाजी दत्तोंना राजापूरला सैन्याची एक तुकडी घेऊन हुकुमाची वाट बघत थांबावयास सांगायचे. दर्यासारंगासही आरमारानिशी सज्ज राहण्याचा हुकूम द्यायचा. त्याचप्रमाणे कारवारच्या बाजूला व पूर्वेस भीमगडच्या बाजूला असलेल्या मराठी ठाणेदारांनाही सज्ज ठेवायचे. कमीत कमी दोन हजार मराठी सैन्य गोव्यात गुप्त रूपाने पेरले गेले, की एक विशिष्ट दिवस निश्चित करावयाचा आणि त्याच दिवशी एकदम, आत घुसलेल्या मराठ्यांनी आतून उठाव करायचा. उत्तरेकडून अण्णाजी दत्तोंनी म्हापशाच्या बाजूने गोव्यावर हल्ला चढवायचा. मराठी आरमाराने त्याच दिवशी एकदम गोव्याच्या किनाऱ्यावर आणि आरमारावर हल्ला चढवायचा. प्रत्यक्ष महाराजांनी नऊ हजार सैन्यानिशी एकदम चालून जायचं. दक्षिणेकडून व पूर्वेकडूनही असेच हल्ले चढवायचे आणि बेसावध असलेल्या पोर्तुगीझांना प्रतिकार करायला अवसरही न देता सारा गोवा व्यापून झाडून सारी फिरंगी फौज आणि आरमार एका दिवसात फस्त करायचं असा विलक्षण धाडसी आणि महत्त्वाकांक्षी डाव महाराजांनी योजला.

झाले. ठरल्याप्रमाणे गुपचूप डावाला सुरुवात झाली. नारव्याहून गोवा फारच जवळ. महाराजांच्या छावणीतले मराठे

चोरून, लपून, आडमार्गांनी, रात्री, अपरात्री, वेषांतरं करून गोव्याच्या मुलुखात घुसू लागले. एका बाजूला मंदिराचे चिरे घडवले जात होते. गोव्यातील मराठी वकील अत्यंत सावधपणे, ही पुढची लष्करी कारवाई लक्षात ठेवून वागत होता.

अण्णाजी दत्तो राजापुरास येऊन बसले. राजापूर तसं पाहिलं तर गोव्याच्या सरहद्दीपासून बरंच दूर होतं. त्यामुळे एकदम कोणाला संशय येण्याचंही कारण नव्हतं. सिंधुदुर्गापाशी, म्हणजे मालवणच्या बंदरात आरमारही तयार राहिलं.

आठ दिवस गेले. पंधरा दिवस गेले. एक महिना गेला. जवळजवळ साडे सातशे मराठे सैनिक फिरंगी मुलुखात विखरून गुप्तपणे वावरत होते. महाराजांचा गोव्यातील एक वकील वारंवार फिरंग्यांच्या गव्हर्नर जनरेलाला भेटून मैत्रीचं नातं घट्ट करीत होता. महाराजांचा डाव कसा अगदी बिनबोभाट आणि बिनतोड रचला जात होता. फिरंगी सत्तेला असा काही जबरदस्त सुरुंग लागणार होता, की काय झालं हे सांगायला एखादा तरी फिरंगी शिल्लक राहणार की नाही याची शंका निर्माण व्हावी. असा कावा, असा छापा आजवर कोणालाही साधला नव्हता. ते यश महाराजांच्या शेल्यात पडणार होतं. गोव्यातून मराठी वकिलाकडून अनेक बातम्या गुप्त हेरांमार्फत महाराजांना मिळत होत्या. एक दिवस तर अशी बातमी आली, की गोव्याचा खासा फिरंगी गव्हर्नर जनरेल आजारी पडला आहे. अंथरुणावर पडून आहे. म्हणजे अगदी उत्तम बातमी होती. कौल उजवा होता.

एके दिवशी दुपारी त्या आजारी गव्हर्नर जनरेल जुवांव नूवीस द कुंज कोंदी दे सां व्हिसेंती यांच्या निवासस्थानातून एक घोडेस्वार बाहेर पडला. हा फिरंगी घोडेस्वार दौडत निघाला आणि मराठ्यांच्या वकिलातीत आला. त्याने मोठ्या अदबीने मराठ्यांच्या राजदूताला प्रणाम केला आणि त्याने गव्हर्नर साहेबाचा निरोप मराठी वकील पंतांस सांगितला, की अगदी ताबडतोब काही एका महत्त्वाच्या कामासाठी गव्हर्नरसाहेबांनी आपणास बोलावलंय.

मराठी वकील दरबारी पोषाख पेहरून पालखीतून फिरंग्यांच्या निवासस्थानाकडे निघाले. त्यांच्या मनात कुतुहल होतं, की कशासाठी एवढं बोलावलं असेल ? हा खासा फिरंगी तर आजारी आहे, गादीवर झोपून असतो. वकीलसाहेबांच्या अंतर्मनात दुसरं गोड स्वप्न तरळत होतं. याच गोव्यावर थोड्याच दिवसात भगवा झेंडा फडकू लागणार याचं! त्यासाठीच होणारा प्रचंड उठाव, आरमारी तोफांचा भडीमार, अण्णाजी दत्तोंची चढाई. सर्व बाजूंनी फिरंग्यावर होणारा मराठी एल्गार आणि त्याच रणकल्लोळात प्रत्यक्ष महाराजांचं होणारं स्वतंत्र गोव्यातील आगमन ! स्वप्न सप्तरंगी होतं !

वकीलसाहेबांची पालखी गव्हर्नराच्या निवासस्थानी आली. एका भव्य दिवाण-

खान्यात वकीलसाहेब प्रवेशले. अगदी समोर एका खुर्चीवर गव्हर्नर जनरेल व्हिसेंती बसला होता. तो गंभीर होता. आजारपण त्याच्या मुखावर स्पष्ट दिसत होतं. खरोखर हा व्हिसेंती फार आजारी होता. तरीही गव्हर्नर जनरलच्या अधिकारपदाची व मानाची सर्व चिन्हे धारण करून दरबारी पोषाखात व्हिसेंती बसला होता. आवतीभवती फिरंगी सैनिक उभे होते. वकीलसाहेब या भव्य दिवाणखान्यातून संथ पावले टाकीत एका विशिष्ट अंतरापर्यंत चालत गेले. आणि तेथे अदबीने उभे राहिले. तेव्हा व्हिसेंतीने वकीलसाहेबांना हाताने जवळ येण्याची खूण केली. व्हिसेंती आजारी असल्यामुळे मुद्दाम जवळ बोलावून काही सांगणार असं स्पष्टच दिसत होतं. वकीलसाहेब जवळ गेले. ते येताच व्हिसेंती गंभीरपणे उभा राहिला आणि त्यानं काही कल्पना यायच्या आतच मराठी वकीलसाहेबांच्या फाड फाड तीन मुस्कटात भडकावल्या ! काय हा प्रकार ! केवढा हा अपमान ! संतापण्या-आधी वकीलसाहेब क्षणभर गोंधळूनच गेले. असं काही घडेल याची कल्पनाही नव्हती. ते भयंकर संतापले. त्यांनी खवळून व्हिसेंतीला जाब विचारला.

" काय म्हणून ? का ? का ?"

व्हिसेंतीने एकही अक्षर न उच्चारता फक्त उजव्या बाजूस दूरवर बोट टवकारले. त्या दिशेला वकीलसाहेबांनी बघीतलं. शेकडो मराठी गुप्त सैनिकांना फिरंग्यांनी पकडून आणून तिथं दूर हॉलबाहेर उभं केलेलं होतं. गोव्यात गुप्तपणे शिरलेल्या असंख्य मराठ्यांना फिरंग्यांनी अचानक पकडून आणलं होतं ! मराठी शिपाई योजून आणि बिनबोभाटपणे आत गोव्यात शिरले होते. व्हिसेंतीनेही अचूक टिपून या गुप्त सैनिकांना अचानक कैद करून आणलं होतं. सारा प्रकार न बोलताच वकील-साहेबांच्या लक्षात आला होता. डाव साफ फसला होता. नव्हे अंगलट आला होता. बोलायला जागाच नव्हती. स्वप्नाच्या ठिकऱ्या उडाल्या होत्या. प्रचंड विजयाऐवजी प्रचंड फजिती पद-रात पडली होती. त्यात भर भयंकर अपमानाची. वकीलसाहेबांनी मान खाली घातली. व्हिसेंतीने ताबडतोब आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना हुकूम फर्मावला, की या वकिलाला आणि या पकडलेल्या पाचशे मराठ्यांना आत्ताच्या आत्ता हद्दपार करा !

हुकूमाची अंमलबजावणी ताबडतोब झाली.

व्हिसेंतीने आपल्या अंगावरचा तो लष्करी पोषाख उतरवला आणि त्याने बिछान्यावर परत अंग टाकलं. तो खरो-खरच फार आजारी होता. तरीही एका दिवसात त्याने साऱ्या राजकारणावर मात केली.

महाराज नारव्याला छावणीत होते. हे काही तरी भलतंच रामायण घडलंय याची कल्पना महाराजांना नव्हती.

सप्तकोटीश्वराच्या मंदिराची पूर्व-तयारी पूर्ण होत आली होती. आता फक्त बांधणीचा मुहूर्तच राहिला होता.

एवढ्यात गलबला झाला. महा-

राजांचं लक्ष छावणीबाहेर गेलं. निःशस्त्र करून हाकलून दिलेले मराठी गुप्त सैनिक आले होते. त्यातच होते मराठी वकील ! राजदूत ! महाराज थक्क झाले होते. न लढताच पराभूत मराठी सैनिक महाराजांपुढं माना खाली घालून उभे राहिले. वकीलसाहेबांना तर पापणीही वर करवत नव्हती.

व्हिसेंतीचेही गुप्त हेर गोव्याच्या सर्व भागात होतेच की ! त्यांनी गोव्यात चोरून शिरणाऱ्या मराठी गुप्त सैनिकांची खबर व्हिसेंतीला सतत दिली. झालं ! इथंच महाराजांच्या गनिमी काव्याला तडा गेला. फिरंग्यांनी मराठी गुप्त सैनिकांवर कडक पाळत ठेवली. उभय पक्षांच्या हालचाली अत्यंत गुप्तपणे व दक्षतेनं चालत होत्या. शेवटी व्हिसेंतीनं अत्यंत गुप्तपणे आपलं सारं आरमार गोव्याच्या किनाऱ्यावर लढाईच्या तयारीनं आणून ठेवलं. सर्व कोटकिल्ल्यांना युद्धाच्या तयारीनं दक्ष राहण्याचे त्याने गुप्तपणे हुकूम आणि इशारे दिले. त्यानं आपली झाडून सगळी राखीव फौज हळूहळू आग्वादच्या किल्ल्यात एकत्र केली. यात पुन्हा कसलीही धावपळ नाही. गाजावाजा तर नाहीच नाही. संशयाला जागा नाही, अशी सावधानता! म्हणजे अत्यंत बेसावध अवस्थेत फिरंग्यांवर दहाही दिशांनी एकदम झडप घालायची महाराजांची तयारी चालली होती. पण त्याच वेळी व्हिसेंतीने प्रत्येक आघाडीवर कडवी झुंज देण्यासाठी आणि आत घुसलेले मराठे टिपून कैद करण्यासाठी सुसज्ज योजना केली होती. तीही अगदी गुप्तपणे !

अन् त्यानं हेरून ठेवलेले सर्व गुप्त मराठी सैनिक एके दिवशी अकस्मात कैद झाले ! त्याच वेळी सर्व नाक्यामोक्यांवर तोफा बंदुकांनिशी फिरंगी फौजांचे मोर्चे युद्धाच्या तयारीत उभे राहिले. अन् त्याच वेळी मराठी वकिलाला व्हिसेंतीने आपल्या निवासस्थानी भेटीला बोलावलं. हा सारा खेळ व्हिसेंतीनं अत्यंत बेमालूमपणे केला. सारेच मराठे थक्क झाले.

महाराज संतापले. डाव फसला हे एक कारण. पण व्हिसेंतीनं मारहाण करून मराठी वकिलाचा भयंकर अपमान केला हे दुसरं कारण. ते संतापून ओरडले,

'फिरंग्यांना बुडविलंच पाहिजे !'

अकरा हजार फौज महाराजांपाशी होती. शिवाय अण्णाजी दत्तो व इतर सरदार-ठाणेदार महाराजांच्या हुकूमाची वाट बघत होतेच. अचानक झडप घालायची कल्पना फसली होती. तरीही गोव्यावर एलगार करण्याचा बेत महाराजांनी केला.

सप्तकोटीश्वराच्या मंदिराच्या बांधकामाचे चिरे आणि साहित्य तयार होते. अवकाश होता मुहूर्ताचा.

महाराज संतप्त अवस्थेतच पुढचा आराखडा आखीत होते. त्याच वेळी गोव्याच्या सरहद्दीवरून मराठी छबिन्याचे स्वार बातम्या आणीत होते, की फिरंग्यांनी युद्धाच्या तयारीनं सर्वत्र मोर्चे बसविले आहेत ! किल्लेकोट आणि

आरमार जय्यत तयार आहे !

महाराजांना याचा अर्थ समजत होता. याचा अर्थ युद्धाला फिरंग्यांनीच आव्हान दिलंय असा होता. फिरंग्यांवर चढाई करून गोवा घ्यायचा म्हटलं तर अशक्य नव्हतं. पण अवघड होतं. कारण फिरंगी अत्यंत चिवट होते. मुंगळ्यां-सारखे हट्टी. कमरेत तुटतील पण हातांनी घातलेली कैंची सोडणार नाहीत. हे युद्ध सुरू झालं तर वर्षन् वर्ष आटोप-णार नाही. फिरंगी असे चिवट आहेत, म्हणूनच तर एका घासांत त्यांना गिळून टाकण्याची योजना केली होती. पण डाव विस्कटला होता.

खवळलेले महाराज आता व्यवहारी गणित करीत होते. गोव्यावरची मोहीम करणं हे या वेळी आर्थिक, राजकीय आणि लष्करी दृष्टीने फार महाग पडेल असंच स्पष्ट दिसत होतं. उत्तर कोक-णात माहीमपासून चिचणी-तारापर्यंत व मधेच चौलला फिरंग्यांचीच सत्ता होती. जंजिऱ्याचा सिद्दीही स्वराज्याचा वैरीच होता. तो फिरंग्यांना मदत करील हे उघड दिसत होतं. जर गोव्यावर आघाडी सुरू केली तर कल्याण भिवंडी प्रांतात आणि कुलाव्याच्या भागात शत्रू उठाव करील. मग दोन-तीन आघाड्यांवर युद्ध चालू ठेवणं जरासं ताणाचं ठरेल. म्हणून महाराजांनी गोव्यावर एल्गार करण्याचा बेत केला.

एकदा पसरलेला डाव आता पुन्हा साधणार नाही याचं दुःख त्यांना होत होतं.

महाराज एकाग्र झाले होते. थोड्या वेळाने म्हणाले,

" पंत, पूजेची तयारी करवा. आम्ही श्रीची पूजा करणार. इथल्या पुजाऱ्यांना बोलावून घ्या. "

पंत तावडतोब पूजेच्या सिद्धतेस लागले. महाराज त्या झावळ्यांच्या मांडवाखाली उभे होते. झावळ्यांच्या अनंत फटीतून वरची फांद्याफांद्यांची दाटी व दाटीतून अधूनमधून दिसणारे निळे आकाश दिसत होते. महाराजां-च्या मनात असंख्य विचारांचे कल्लोळ उठत होते. श्रीसप्तकोटीश्वर ! म्हणजे सात कोटींचा अधिपती ! म्हणजेच सात कोटी सैन्याचा सेनापती ! पण काय ही आजची स्थिती ! महाराष्ट्र जनांचं हे महान दैवत. काशीविश्वेश्वरा-इतकाच याचा महिमा. पण भक्त नादान आणि नामर्द बनले म्हणजे सारे अपमान, हाल आणि हलाहल सोसावं लागतं देवांना. कुठंय तो त्रिपुरासुराचा नाश करणारा त्रिशूळ ? कुठंय तो अंधः-कारासुराला छेदून टाकणारा दिव्य बाण ? कुठंय तो आकाश–पाताळ घुमवून टाकणारा डमरू ? कुठंय त्या घमेंडखोर मदनाला एका कटाक्षात भस्म करून टाकणारा तो तिसरा नेत्र ? कुठं आहेत त्या भूतवेताळांच्या अघोरी फौजा ? कुठं आहे ती महिषासुराला मारणारी पार्वती भवानी ? महाराज टक लावून सप्तकोटीश्वराकडे पाहत होते. सुवर्णमिश्रित ताम्रवर्ण शिवलिंग चमचमत होतं.

खरंच कुठं होती ती दिव्य शस्त्रं ? कुठं होता तो तिसरा तेजस्वी डोळा ?

कुठं होतो ती भवानी ? कुठं होती ती भयंकर फौज ?

हे सारं प्रत्यक्ष महाराजांपाशीच होतं !

शुचिर्भूत होऊन महाराज श्रीच्या पूजेस बसले. तेथील श्रीच्या महाजनांनी मंत्र म्हणावयास प्रारंभ केला. दिवे उजळले. सुगंध दरवळू लागला. अभिषेकाच्या धारा त्या चमकत्या पिंडीवर बरसू लागल्या. वेदमंत्रांनी श्रीसप्तकोटीश्वराची ती 'झोपडी' भारावून गेली. दुपारची वेळ होती. अधूनमधून चार-दोन उन्हाचे कवडासे महाराजांच्या अंगावर खेळत होते. वाऱ्याची सळसळ ऐकू येत होती.

पूजा संपत आली. महाराज श्रीस बिल्वदल आणि पुष्पं वहात होते. एवढ्यात खळ्ळ, सळ्ळ असा आवाज झाला आणि वर छपराला लावलेल्या नारळीच्या वाळक्या झावळीतली एक झावळी निसटली. अन् ती पडली ती नेमकी महाराजांच्या अंगावर ! महाराज फक्त हसले. त्यांनी झावळी बाजूला केली. महाजन गुरुजी म्हणाले,

"शुभशकूनच म्हणायचा हा !"

"कोणत्या अर्थानं ?"

"महाराज, श्रीसप्तकोटीश्वरानं ही झावळी पाडून आपली मागणी आपल्याला सांगितली."

"कोणती मागणी गुरुजी ?"

"महाराज, श्रीचं नवीन मंदिर आपण बांधावं हाच श्रीचा कौल आहे. महाराज हे सप्तकोटीश्वर म्हणजे राजकुलाचं दैवत. आता इथं श्रीराज्य आलं. धर्मराज्य आलं. आता श्रीसप्तकोटीश्वर असा उन्हापावसात उघड्यावर असू नये महाराज !"

"होय, आमचीही इच्छा तीच ! गुरुजी श्रीचं मंदिर नवीन बांधलं जाईल. या कदंबभूमीत श्रीचं वास्तव्य निवांत आणि निर्धास्त राहील. कसलाही उपद्रव होणार नाही."

"तथास्तु ! तथास्तु ! शांतिरस्तु ! पुष्टिरस्तु..."

शिंगांनी ललकाऱ्या दिल्या. नौबत वाजू लागली.

□ □ □


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

गूढ चांदणे पसरले आहे

# रात्र रॉय किणीकर






विजय कारेकर

दुरून कुठून तरी अचानक ऐकू येणारे स्वर हे सतारीचे आहेत, की सरोदाचे आहेत, असा संभ्रम एखाद्या दर्दी रसिकालाही कधी व्हावा आणि त्या स्वरांचा शोध घेण्यापूर्वीच ते स्वर आपली किमया ठेवून तसेच बेपर्वाईनं विराम पावलेले असावेत. रॉय किणीकरांची 'रात्र' वाचतानादेखील हे काव्य आहे की तत्त्वचिंतन आहे याचा संभ्रम पडतो.

विमनस्क अवस्थेत सतारीचे स्वर कानी पडल्यावर केशवसुतांची जी मन:स्थिती झाली तीच मन:स्थिती 'रात्र' कविता वाचताना प्रत्येक रसिक वाचकाची व्हावी; असे हे एक विलक्षण शक्तीचे काव्य आहे.

अशा कवितेचे रसग्रहण करून ते विशद करणे ही अवघड गोष्ट आहे. तसे करताना मूळ काव्याची रसहानी तर होणार नाही ना, असा प्रश्न पडतो. तरीपण असे काव्य वाचल्यानंतर केवळ राहवत नाही म्हणून रसिकांना निदान आवर्जून बोलवावे आणि सांगावे की, 'पहा ह्या रात्र-कवितेत कसे गूढ चांदणे पसरले आहे.' आणि मग पाहणारा पाहील आणि त्यात हरवून जाईल. ह्या आवर्जून सांगण्याच्या कर्तव्यासाठी तरी काही लिहावं असं मनात आहे.

प्रत्येक वस्तूला त्रिमिती असते. पण आधुनिक काळात अवकाश व काल ह्या मितीही लक्षात घेऊन वस्तूंना पंचमिती आहे असं म्हटलं जातं. वस्तूच्या अशा मिती ठरवता येतील पण अनुभवाच्या मिती कोणत्या हा एक निरुत्तर करणारा प्रश्न आहे. पण 'रात्र'मधील कविता अनुभवाच्या सर्व मितींना जणू आपल्या-पुढे उभं करतात. जीवनावरचं हे भाष्य उत्कट असूनही तोल न गेलेलं असं आहे.

शब्दाशब्दांच्या पाठीमागे अर्थवाही अशी चित्रं ह्या कवीने लपवून ठेवली

# माणूस रंगतरंग स्पर्धा

# स्पर्धा क्रमांक सात

वसंत सरवटे

"एक दिलके टुकडे हजार हुवे, कोई यहाँ गिरा कोई वहाँ गिरा..."— एका हिंदी चित्रपटातील लोकप्रिय गीत. (एके काळचे!)


पान ३ वर इतस्तत: विखुरलेले १४ तुकडे दिले आहेत—नायकाच्या दिलाचे नव्हेत; त्याच्या छायाचित्राचे!

या तुकड्यातून योग्य ते निवडून ते एकत्र जुळवा व त्यापासून नायकाचे छायाचित्र परत सांधून दाखवा. सर्व १४ च्या १४ तुकडे वापरायलाच पाहिजेत असं नाही.

पान ३ वरील तुकडे कात्रीने कापून घ्या व पान २ वरील कोऱ्या जागेत एकत्र जुळवून चिकटवा. हा नायक कोण? तुम्ही ओळखता? त्याचं नाव सांधलेल्या चित्राखाली लिहा.

स्पर्धकाचे नाव, पत्ता आणि वय

माणूस साप्ताहिक : ३० सप्टेंबर १९७२ : किंमत ५० पैसे
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०. ५७३५९



आहेत असा अनुभव सतत येत राहतो. म्हणूनच तत्त्वज्ञान आणि काव्य हे एकाच पातळीवर कुठंतरी नांदत आहेत, असं वाटायला लागतं. जीवनातील कटू अनुभवांचे वर्णन करताना कवी कुठं आक्रोश करीत नाही किंवा मोहक शृंगाराचं वर्णन करताना त्याच्या अतिरेकानं तो कुठं गुदमरत नाही. असा फार मोठा संयम असूनदेखील ही कविता कुठं अकारण आखीव, शिस्तबद्ध आणि करडी वाटत नाही. तर वाचकांच्या मनात थेट प्रवेश करून त्याचा जिव्हाळ्यानं कबजा घेणारी आणि तिथं शब्द-स्वरांचे काही शिल्प कोरणारी अशी आहे. (याठिकाणी 'शब्द' हा 'तत्त्व' या अर्थाने मी वापरीत आहे.) आणि हे साधणे म्हणजेच ज्याला आपण (communication) सुसंवाद म्हणतो, त्याचा प्रत्यय येतो.

रॉय किणीकर हे कै. चित्रकार दीनानाथ दलालांचे फार जुने जिवलग असे मित्र. त्यांच्या सहवासातूनच त्यांनी आपला अनुभव समृद्ध केला आणि त्यांच्यापासून 'साहित्य निर्मितीचे अज्ञान मिळाले' अशी विनम्र भूमिका रॉयसाहेब घेतात. पण प्रत्यक्षात 'रात्र' कवितेची त्यांची निर्मिती ही स्तिमित करणारी आहे. अनुभवांचा गंभीरपणानं छोटया छोटया कवितांमधून परामर्श घेताना त्या कवितांची कधी कंटाळवाणी मालगाडी होत नाही. त्या कवितांची लय आणि तोल कधी बिघडत नाही. प्रत्येक छोटया कवितेचा ठसा आपल्या मनावर हवेहवेपणानं उमटत राहतो. अशा कवितांचे उमर खय्यामच्या रुबायांशी साम्य पाहण्याचा रसिकांना मोह होतो आणि तसे साम्य आढळले तरी किणीकरांचा स्वतंत्रपणा कुठंच भंग पावत नाही. कारण किणीकरांनी अनुभव व अवसान उसने आणलेले नाहीत. स्वतः अनुभवांच्या विविध प्रहारांनी त्यांनी आपलं बहुरंगी व्यक्तित्व आकारलं आहे; विकसित केलं आहे आणि त्याचा ठसा त्यांच्या काव्यावर संपूर्णपणे उमटला आहे.

हे मायावी घर आपल्या कोणाचेच नाही. इथले गोड कटू अनुभव येऊन दमल्यानंतर रात्रीच्या वेळी जरा निवांत बसावे. मद्याच्या प्याला ओठी लावावा आणि काही चिंतन करावे, अशी जाणीव त्यांच्या पहिल्याच कवितेत आहे.

" दमलास, थांव, ये,  
बैस, ठेव ते ओझे  
हे नसे तुझे रे  
नाही घर हे माझे  
घे उचल, हा इथे  
भरला आहे पेला  
जो गेला येथून  
नाही परतुन आला ॥ "

आणि मग ते स्वतःशीच बोलत राहतात. स्वतःलाच समजावीत राहतात. अफाट गर्दी आणि कोलाहलात सर्वांचा तोल गेलेला आहे; इतिहास घडवणाऱ्या आणि तुडवणाऱ्यांची सर्वांचीच कीर्ती झाली आहे; ह्या पाणवठ्यावर कित्येक घट आले आणि वाहून गेले त्याची गणती नाही,...असे विचार

त्यांच्या मनात येत राहतात. हे ऋतु-चक्राचे चाक कोण चालवते आहे? आपल्या सर्वांचे हे नाटक लिहिणारा, संवाद बसवणारा तो विश्वनायक पडदा पडण्यापूर्वीच कुठे निघून गेला आहे आणि केवळ अज्ञान उरले आहे, मात्र.

कटु अनुभव आणि जोडीला गहन तात्त्विक भाष्याचे टिपण याची एक लांबलचक यादी सामान्य वाचकाला कधीच रुचकर वाटणार नाही. पण रॉयसाहेबांनी कोणत्याही थराच्या वाच-काला वेधून घेईल अशी रचना या 'रात्र'मध्ये साधली आणि पाऊस संपल्यानंतर एखाद्या तारेवरून पाण्याच्या थेंबांची क्षणभंगूर मालिका हळूहळू सर-कत ओघळावी, त्यातील पारदर्शी हसू आणि आसू सामान्य डोळ्यांनाही वेधक वाटावेत, तसेच काहीतरी अशा कवितांबाबत म्हणावेसे वाटते.

अशा काळ्या रात्रीचा अनुभव घेताना...

"चांदणे सांडले गालावरती चिंब
पदरात झिरपले पुनवेचे प्रतिबिंब.
दे भरुनि आणखी, पुन्हा भरू दे पेला
एकदाच आला क्षण गेला तो गेला ॥"

...असे एखादे दृश्य त्याना जवळ करते. पण तरीही 'पदरात आणि अध-रात' ते गुंतून राहत नाहीत. रात्रीची ही राणी खुळी आहे, काळोखही खुळा आहे याची त्यांना जाणीव असते.

त्याना स्वर्ग, नरक, मृत्यू ह्या कल्पना कधीच आपला धाक घालू शकत नाहीत. स्वर्गात काही सोन्याची माती नसते आणि स्वर्गाचे आतील दार हे नरकाचे आहे. तो एक खोटा बाजार आहे ह्या विश्वासामुळे ते कधी स्वर्ग नरकाबाबत चक्रावून जात नाही.

ह्या नाटकाचा खेळखंडोबा करून स्वत: अज्ञात राहिलेल्या देवाची भीतीही त्यांच्या मनात प्रवेशत नाही. कुजलेल्या देव्हाऱ्याला लाथ मारावीशी वाटते आणि देवळातील भडव्यांचा बाजार पाहून मूर्ती फोडाव्यात असे मनी येते.

ज्या ज्या वेळी जीवनाचा प्रवाह अनेक वळणे घेऊन धावत येतो आणि कुठेतरी त्या गतीने भोवंडून एक भोवरा तयार होतो, जीवन दडपल्यासारखे, ओढल्यासारखे वाटू लागते त्यावेळी कवीच्या मनाचा क्षोभ होतो आणि तो क्षोभ काव्यात प्रकट होऊ लागतो. त्याला तत्त्वाची एक गहरी ओढ लागून राहते. आणि मग कवितेचे एक विलक्षण रूप तयार होते. रॉय साहेबांच्या काव्या-बाबत हेच नेमके घडून येते.

विफलतेच्या टोकाचा अनुभव मांड-ताना आजची नवी कविता केवळ शून्य-वादी बनते. कोणतीही बाजू सांगताना ती क्वचितच भावात्मक विश्लेषण करते. एरव्ही सर्व सूर नकारात्मकच असतो. पण किणीकरांच्याबाबत असे होत नाही. विफलतेच्या कारणांचे ते चिंतन करतात. विफलतेच्या आहारी जाऊन रात्रीच्या अंधारात लिंगवास-नांच्या मागे भरकटत नाहीत. मद्याचा पेला हवा आहे; पण तो सर्वस्वी बुडून जाण्यासाठी नव्हे; तर न संपणाऱ्या वेदनेशीच तिला स्वत: बोलावून पुन:

सोबत करावी म्हणून.

ह्या संग्रहातील प्रत्येक कवितेवर रात्र रात्र बोलता येईल. प्रत्येक कविता आपल्या मैत्रीची होऊन जाईल आणि रात्रीच्या मन:स्थितीत वेगळचाच प्रकाशाचे दीप जाळत राहील. म्हणूनच प्रत्येक कवितेतील आशय न सांगता त्या कविता तुमची प्रत्येक रात्र-मनस्थिती उजळून टाकेल, एवढेच आत्मविश्वासाने म्हणावेसे वाटते. □

**रात्र**

रॉय किणीकर

प्रकाशक : ललिता किणीकर

श्रीशब्द प्रकाशन, पुणे

मूल्य : तीन रुपये

---

व्यावहारिकदृष्टचा सामान्यात जमा होणारे हे चरित्र. पण या सामान्याने एका विशाल उद्दिष्टाच्या रथाशी स्वत:ला बांधून घेतले आणि रस्त्यावरच्या दगडधोंड्यांनी शरीर व मन घायाळ होत असतांही कधी सुखाचा निवारा शोधला नाही. जखमी होऊनही पराभूत न झालेल्या, प्रसादाच्या अपेक्षेवाचून पूजा करणाऱ्या, उजेडाच्या उपासनेसाठी काळोख विकत घेणाऱ्या माणसाची, एका विठू मास्तराची ही कहाणी. त्या कार्यकर्त्याच्या शब्दात थोडा बदल करून मी शेवटी म्हणेन, 'लाँग लिव्ह विठू मास्तर!'

—कुसुमाग्रज

# कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके

दहा रुपये

राजहंस प्रकाशन

---



# मी नेताजींना बघितलंय्!

जबानी दुसरी : हप्ता दुसरा

लेखक : नारायण सान्याल
अनुवादक : अशोक शहाणे

किंवा आता हरगोविंदसिंगची गोष्ट घ्या. त्याची गोष्ट तुम्ही आधी कुठं वाचल्यायत का नाही, मला कल्पना नाही. पण ह्या दोन वर्षांच्या काळात त्याची अन् माझी भलनीच दोस्ती होऊन गेली होती. हरगोविंद अजून आहे का नाही, मला काहीच माहीत नाही. मी हे जे लिहितोय् ते त्याच्या वाचण्यात आलं तर मनातल्या मनात हसेल बहुतेक. पण तरी त्यालादेखील कबूल करावं लागेल, की मी ह्या गोष्टीत पदरचं काहीएक घातलेलं नाही.

हरगोविंदसिंग सिंगापूरचा मोठा धंदेवाला होता. चांगला जवानमर्द माणूस. अवघं पंचवीस-सव्वीस वय असेल. चांगला धडधाकट इसम. मजबूत शरीर. उंचनीच. सहा फुटांपेक्षाही जास्तीच. भली रुंद छाती. बारीक कंबर. दणकट मनगट. डोकंभर केस.

## चालू लेखमाला

टाळूवर गुंडाळलेले. वर शौकीन रंगीत पगडी. दाट काळयाकुळकुळीत दाढी-मिशा. हातात लोखंडाचं कंकण. अकाली शीख होता हरगोविंदसिंग. राक्षसा-सारखा प्रचंड माणूस !

सिंगापुरात त्याचं कुणीच नव्हतं म्हणे. तो सडाफटिंग होता. अन् तरी पैसा मात्र त्याच्याजवळ गडगंज होता. तो सतरा वर्षांचा होता तेव्हा बापावर रुसून तो घराबाहेर पडला होता. मग चाटगावच्या एका सारंगाच्या मदतीनं समुद्रपार.

त्याच्या वडलांचा कलकत्त्यात धंदा होता. अन् धंदा चांगलाच चालला होता. भवानीपूरला त्यांचं एक प्रचंड मोटार-गॅरेज होतं. तिथं मोटारींची दुरुस्ती चालायची. शिवाय स्पेअर-पार्टस्ची विक्रीपण व्हायची. थोडक्यात म्हंजे हरगोविंदसिंगचे वडील, इंडिया मोटर्स प्रायव्हेट लिमिटेडचे सीनियर पार्टनर सरदार प्रीतमसिंग लाखाची उलाढाल करायचे. कलकत्त्यात वेग-वेगळ्या रूट्सवर त्यांच्या वीसेक प्रायव्हेट बसेस चालायच्या.--असे हे हरगोविंदसिंगचे तीर्थरूप.

हरगोविंदसिंग फारसा शिकलाबिकला नव्हता. बेरीज करता यायला लागल्या-लागल्या बापानं त्याला शाळेऐवजी कारखान्यात घातलं होतं --काम शिकून घे. लिहिणं-वाचणं शिकून काय कपाळ व्हायचंय--असं बापाचं म्हणणं. पोरगं बेरीज शिकलंय् तेवढं पुरेसं आहे अशीच बापाची समजूत होती बहुतेक. वजा-बाकी काही कामाचीच नाही. कारण तो काळच असा होता, की हरगोविंद-सिंगच्या वडलांनी माती हातात घेतली तरी तिचं सोनं होत होत.

काहीतरी क्षुल्लक कारणानं बाप-लेकाचं भांडण झालं. बापानं डोळे लाल केले. म्हणाला--चालता हो घरातनं. बापाच्या पैशावर नबाबी करतोय्स ! लाज नाही वाटत काही ? अंगात हिंमत असेल तर मोलमजुरी करून पोट भागव. जा !

पोरगंपण तसंच अभिमानी. जिद्दी. परत तितकाच बेफिकीर.

बापाला म्हणाला--ठीक है ! मान लिया !

अन् हरगोविंदसिंग अंगावरच्या कपड्यानिशी बाहेर पडला होता. तो काही परत घरी गेला नाही.

प्रीतमसिंगची बायको रडायला लागली. तेव्हा त्यानं तिलाच धमकावलं उलटं--जातोय् कुठं ! आठवड्याभरात घरी परतेल ! तू बघ नुस्ती गप्प !

तर हरगोविंदसिंगच्या आईनं गप्प बघतच दिवस काढले होते. सात दिवस नाही, सात वर्षं पण पोरगं काही घरी परतलं नाही. अन् पोरगं मुळी देशात

होतंच कुठं परतायला !

हरगोविंदसिंग पहिल्यांदा ब्रह्मदेशात गेला होता. रंगूनला जरेवाद्यांच्या अड्ड्यावर. पण ते वातावरण काही त्याला रुचलं नाही.

मग तिथनंपण पळून गेला. ह्या खेपेला सिंगापूरला आला. अद्भुत. कर्तबगार पोरगा. स्वतःच्या बळावर एवढा मोठ्ठा धंदा उभा केला होता. त्यानं.

पहिल्यांदा नोकरी धरली होती हरगोविंदसिंगनं, एका मोटर-रिपेअरिंग गॅरेजमधे, रोजंदारीवर. कामाचं प्रेशर फार होतं. रोजच चारपाच तास ओव्हरटाईम करायला लागायचा.

तीन महिन्यातच हरगोविंदसिंग त्या गॅरेजमधला सर्वात भरोशाचा कामगार म्हणून ओळखला जायला लागला.

पण वर्ष भरायच्या आतच हरगोविंदसिंगनं ती नोकरी सोडून दिली.

चांगला वस्ताद पोरगा ! ब्रिटिश सैन्याच्या छावणीत त्यानं ओळखीपाळखी करून ठेवल्या होत्या. जिमखाना क्लबमधनं स्कॉच व्हिस्कीची बाटली खरेदी करून ओव्हरकोटच्या खिशात टाकून हरगोविंदसिंग ती पोचती करायचा बावीस नंबर इनफंट्री ब्रिगेडच्या कमांडरच्या ऑफिसमधे. अन् ऑर्डर्स पदरात पाडून घ्यायचा. लहान-सहान कामं. बाहेरच्या दहा जणात ती कामं वाटून देऊन तो ऑर्डर पुरी करायचा.

नंतरची पायरी म्हंजे सरदारजीनं स्वतःच एक कारखाना काढला. स्वतः रावायचा तिथं. तरी काम पुरं होईना, तशी चार माणसं नेमावी लागली त्याला. आकाशात लांबवर दिसणारा प्रकाशाचा कण जसा हलकेहलके उल्केचं रूप घेऊन प्रकट होतो, तसाच हरगोविंदसिंगचा कारखानापण दिवसेदिवस आकारानं मोठ्ठा मोठ्ठा व्हायला लागला.

लढाईच्या बाजारात त्यानं खोऱ्यानं पैसे ओढले होते. बाराव्या इंडियन ब्रिगेडच्या कमांडरची त्याच्यावर मेहेरनजर झाली. निव्वळ मोटारींची दुरुस्ती नाही, पेट्रोलची सप्लाय-एजन्सी मिळाली हरगोविंदला. ट्रकनं लष्करी सामान न् मजूर इकडनं तिकडं न्यायचा-आणायचा ठेकापण मिळाला.

कंगाल असलेला हरगोविंदसिंग निव्वळ पाच वर्षात लखपती झाला. चायनाटाऊनच्या उत्तरेला त्याचा प्रचंड कारखाना होता. शहरात दोन घरं होती. गाडी होती. लढाईच्या कामात आठेक ट्रक धावपळ करत होते.

इतक्या दिवसात घराची आठवणदेखील झाली नाही हरगोविंदसिंगला. एवढी फुरसतच कुठं होती ! पण आता त्याला घराची आठवण व्हायला लागली. आपले आई-वडील म्हातारे झालेयत. वडलांचे सगळे केस पिकलेयत. दाढीदेखील पांढरी आहे. अन् आईचं किती प्रेम होतं आपल्यावर !

वडील म्हणाले होते, ' ताकद असेल तर निढळाचा घाम गाळून रोजगार करून दाखव न् मगच बोलायला ये. ' तेच केलं होतं हरगोविंदसिंगनं. निढळाचा

घाम गाळून आज तो लखपती झाला होता. म्हंजे आता वडलांशी बोलता येणार होतं.

मग हरगोविंदसिंगने वडलांना पत्र लिहिलं. नाही—वडलांना नाही, इंडिया मोटर्स प्रायव्हेट लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर सरदार प्रीतमसिंगना पत्र लिहिलं. पत्र पोरानं नाही लिहिलं. सिंगापूर ऑटोमोबाइल्सचा एकछत्री मालक हरगोविंदसिंगनं पत्रं लिहिलं.

रीतसर लेटरहेडवर टाइप केलेलं पत्र—

स. न. वि. वि.

खाली दिलेल्या कंपन्यांची पूर्व-आशियातील होलसेल एजन्सी आमच्याकडे आहे. व्यावसायिक सूत्रानं आपल्याशीही संबंध जोडण्याची आमची इच्छा आहे. कलकत्त्यात आपल्याशी स्पर्धा करणाऱ्या दुकानांना आम्ही माल पुरवत असतो. ह्याच पत्राबरोबर बँक रेफरन्सही पाठवीत आहोत.

-कळावे

सिंगापूर ऑटोमोबाइल्सचा आर्थिक भरभक्कमपणा जाहीर करताना बँकेनं म्हटलं होतं, की एकोणीसशेचाळीस सालच्या ह्या दहा महिन्यात कंपनीनं साडेबावीस लाखाची उलाढाल केलीय्. अन् कंपनीच्या नावानं बँकेत फिक्स्ड डिपॉझिटमध्ये कायमच किमान तीन लाखाची रक्कम ठेवलीय्. पुढं बँकेनं असंही जोडलं होतं, की श्री. हरगोविंदसिंग, 'सन ऑफ सरदार प्रीतमसिंग' हे आमचे खास पॅट्रन आहेत नि सिंगापूर ऑटोमोबाइल्सचे प्रोप्रायटर आहेत.

नशीब बिचाऱ्या हरगोविंदसिंगचं. ह्या पत्राचं काहीच उत्तर आलं नाही कलकत्त्याहून.

त्याच्या आधीच डिसेंबरच्या सुरुवातीलाच सिंगापूरच्या नैऋत्येला असलेल्या कोटाव्हारू गावात जपानी सैन्य उतरलं होतं. निव्वळ तीन महिन्यांत ब्रिटिश कमांडर पर्सिव्हलनं सिंगापूर जपानी सेनापतीच्या हाती देऊन टाकलं. बिनशर्त. अन् सिंगापूरच्या लोकांचा कलकत्त्याशी असलेला संबंध तुटला. धंद्याच्या निमित्तानं आपण लिहिलेलं रजिस्टर्ड पत्र सरदार प्रीतमसिंगांना मिळालं का नाही तेपण हरगोविंदसिंगला कळलं नाही.

ह्या सगळ्या गुप्त खाजगी गोष्टी मला माहीत असण्याचं काहीच कारण नव्हतं. सरदारजींशी घसट वाढल्यावर मग हे सगळं कळलं. खूपच गोष्टी सांगितल्या मला हरगोविंदसिंगनं.

म्हंजे एवढे प्रचंड पराक्रमी ब्रिटिश लोक जपान्यांना कसेकाय शरण आले? कैद्यांना शिबिरात कसं ठेवायचे? पलट खाल्लेल्या परिस्थितीत आपण जपानी सेनापतींशी कसं जमवून घेतलं? नव्या जमान्यात धंदा आणखीनच कसा वाढवला?

थोडक्यात म्हंजे नेताजींनी सिंगापुरात पाऊल ठेवायच्या आधीच इथलं पुरतं चित्र त्यानं माझ्या डोळ्यांसमोर उभं केलं होतं एक दिवस.

पण ते खूप नंतरचं आहे. ते इतक्यातच कशाला! त्याची—माझी पहिली गाठ पडली तो प्रसंग आधी सांगतो.

एक दिवस रात्री तीन वाजता मी हरगोविंदसिंगला पहिल्यादा पाह्यलं. इथं सिंगापुरातच. नेताजींच्या राहत्या घरात. चमत्कारिक प्रसंग होता तो. डोक्यावर प्रचंड पगडी न् छातीवर दाढी रुळतेय् असा हा राक्षसासारखा दिसणारा इसम दयाळू जादूगारासारखा त्या दिवशी समोर येऊन उभा राह्यला होता.

तीच गोष्ट सांगतो आता—

सिंगापूरला असताना नेताजींना तिथल्या रामकृष्ण आश्रमाबद्दल अधनं-मधनं फार मोठं आकर्षण वाटायचं. सबंध दिवसभरचा त्यांचा कार्यक्रम इतका भरगच्च असायचा, की दिवसा त्यांना अजिबातच वेळ व्हायचा नाही. मग कधी कधी मध्यरात्री सगळी कामं उरकून आता झोपायला निघायचं, तर नेताजी ड्रायव्हरला बोलवून घेऊन म्हणायचे—गाडी काढ. आश्रमात जायचंय्.

अन् ते एकटेच जायचे. अंगरक्षक बरोबर असला तरी चिडायचे. मला नाहीतर त्यांच्या ए–डी–सींपैकी कुणाला तरी सांगून जायचे—तुम्ही झोपून टाका. मी जरा मिशनमध्ये जातो.

मग आम्ही त्यांच्या नकळत ताबड-तोब रामकृष्ण मिशनला फोन करायचो. स्वामीजींशी आधीच आतल्या आत आमचा एक ठराव झालेला होता. आमचा फोन आला, की मिशनमधली मंडळी सावध व्हायची. नेताजींची गाडी आश्रमात पोचली, की लगेच ते आम्हाला फोन करायचे. नेताजी आलेयत म्हणून सांगायचे.

परत दोनतीन तासांनी आणखी एक फोन यायचा. आत्ताच नेताजींची गाडी इथनं निघालीय्, असं स्वामीजी सांगा-यचे. मग आम्ही खाली यायचो.रात्रीच्या निर्जन वेळी एवढासा रस्ता काटायला गाडीला पंधरा मिनटं लागायची. आम्ही खाली येऊन वाट बघत बसायचो.

मिशनमध्ये गेल्यावर नेताजी अंगा-वरचे लष्करी कपडे उतरवून ठेवायचे. भगव्या रंगाचा रेशमी कद नेसायचे. उघड्या अंगावर रेशमी उपरणं.

त्यांच्या हँडबॅगमध्ये तीन वस्तू नेहमीच असायच्या—गीतेची एक पॉकेट एडि-शन, वाचायचा एक स्पेअर चष्मा, अन् रुद्राक्षाची जपमाळ. मला काही पक्कं ठाऊक नाही, पण लोक असं म्हणतात, की ह्या तीन गोष्टी म्हंजे नेताजींची अमोल मालमत्ता होती. BLA ७१६९ नंबरची काळी गाडी जेव्हा मौलवी झियाउद्दीनला घेऊन एल्गिन रोडवरच्या त्या घरापास्नं निघाली, तेव्हा ह्या अमोल रत्नांचीपण यात्रा सुरू झाली. अफगाणिस्तान–मॉस्को– इटाली– जर्मनी – मादागास्कर – टोकिओ – बँकॉकवरनं फिरून ही तिन्ही रत्नं ह्या सिंगापुरात येऊन पोचली होती.

तर दाराच्या बाहेर टोपी, ब्रीचेस न् टॉपबूट पडून राह्यचे. बंद दाराच्या मागं नेताजी ध्यानस्थ बसायचे. सिंहा-सनावर श्रीरामकृष्ण परमहंस, ह्या हाताला श्री. शारदा माता न् त्या हाताला स्वामी विवेकानंद.

महाराज उदबत्त्या लावून द्यायचे, विजेचे दिवे मालवून टाकायचे, अन्

निरांजन तेवतं करायचे. हे सगळं आमचा फोन मिळाल्याबरोबर ते उर कायचे.

बाहेर ब्लॅक-आउटचा घनदाट काळोख, जपानी भोंग्यांची कर्कश किंकाळी, कधीकधी कार्पेट-बॉबिंगचे स्फोट. अन् निरांजन तेवत असलेल्या त्या साधना-कक्षांत ' समकायशिरग्रीव ' एक संन्यासी निरांजनाच्या निवांत निष्कंप ज्योतीच्या शेजारी बसून त्या ज्योतीचंच उपमान बनून तासन्तास बसून असायचा ! इंफाळ-कोहिमा एवढंच काय पण सबंध भारतवर्ष सावली बनून, एक बिंदू बनून अंतर्धान पावायचा. चैतन्यमय विश्वांत परम ज्योतिर्मयाच्या आत विलीन होऊन जायचा एक मुक्तिकामी जीवात्मा !

अशाच एका विचित्र रात्रीची गोष्ट.

साडेअकराच्या सुमाराला नेताजींची गाडी बाहेर पडली होती. अंगरक्षकपण बरोबर नव्हता. ड्रायव्हरच तेवढा होता. टेलिफोनच्याजवळ जागत बसला होता लेफ्टनंट विश्वंभर पांडे. मी शेजारच्या खोलीत झोपलो होतो. फोनची घंटा वाजली — म्हंजे नेताजींची गाडी रामकृष्ण मिशनमधनं निघाल्याची खबर मिळाली — की विश्वंभरनं मला उठवायचं असं ठरलं होतं.

बरोबर दोन वाजले होते—फोनची घंटा खणखणली. माझी झोप उडाली. मिशनमधनं स्वामीजींनी सांगितलं, की नेताजींची गाडी ही आत्ताच गेली म्हणून.

आम्ही खाली येऊन वाट पहात बसलो.

पंधरा मिनटातच गाडी येऊन पोचायला हवी. नेहमी तशीच यायची. म्हंजे पंधराएक मिनटात. पण त्यादिवशी अर्धातास होऊन गेला तरी नेताजींची गाडी काही आली नाही.

इतका उशीर का म्हणून होतोय् ? आम्ही चांगलेच बेचैन होऊन गेलो.

शिवाय आपण रात्री असे रामकृष्ण आश्रमात जातो ह्या गोष्टीचा गाजावाजा नेताजींना पसंत नव्हता. त्यामुळं दुसऱ्या कुणाला फोनपण करता येत नव्हता.

शेवटी तीन वाजायला आल्यावर मात्र मला राहवेना. हेडक्वार्टर्सच्या सिक्युरिटीरूमला फोन करावा म्हणून मी नंबर फिरवायला लागलो — एवढ्यात अचानक एक गाडी पोर्टिकोत येऊन उभी राह्यली !

पण गाडी नेताजींची नव्हती !

पहारेकऱ्यानं चॅलेंज केलं.

अन् गाडीतनं खुद्द नेताजीच उतरले !

अन् त्यांच्यामागोमाग सहा फूट उंचीचा आडदांड सरदारजी ! हरगोविंदसिंग !

नेताजी त्याला म्हणाले—धन्यवाद ! फार त्रास झाला तुम्हाला !

हरगोविंदसिंगनं दोन्ही हात जोडून, मान झुकवून नमस्कार केला. बोलला काहीच नाही. अन् लगेचच गाडी घेऊन निघून गेला.

नंतर ड्रायव्हरकडनं सगळा प्रकार कळला.

परत येताना वाटेतच गाडी बिघडली. ड्रायव्हरची भलतीच पंचाइत झाली. ब्लॅक-आउटची रात्र. निर्जन रस्ता. नेताजींना एकटं ठेवून खबर द्यायला म्हणूनपण त्याला कुठं जाता येईना. आसपासची सगळी दुकानं अंधारात बुडलेली. चिडीचिप. रात्रीचा दोन-अडीचचा सुमार.

अचानक दिसलं --- एक प्रचंड सरदारजी मोटर-सायकलवरनं चाललाय्. त्याला हाक मारावी लागली नाही, की थांबवावं लागलं नाही. रस्त्याच्या कडेला गाडी आहे न तिचं बॉनेट उघडं आहे, असं बघितल्यावर तो आपणहूनच थांबला.

गाडीकडे येता-येताच म्हणाला—लष्करी गाडी आहे हं! काय झालं? पेट्रोल संपलं?

--जी नही! पेट्रोल तो है काफी, लेकिन--

पण हरगोविंदसिंगनं लेकिन पुरं व्हायची वाटच बघितली नाही. त्यानं उघड्या बॉनेटच्या खाली डोकं खुपसलं. दोन-चार मिनूटं इथंतिथं हात घालून पाह्यलं. मग दक्ष वैद्यासारखं आपलं निर्णायक मत त्यानं देऊन टाकलं--ही गाडी काही आत्ताच चालू व्हाय़ची नाही. डिस्ट्रिब्यूशन बॉक्सचा एक पार्ट बदलायला हवाय्. कुठं जायचंय् तुम्हाला? गाडीत कोण आहे?

गाडीत कोण आहे ते सांगायचं काही ड्रायव्हरच्या मनात नव्हतं. पण हरगोविंद काही उत्तराची वाट पहाणाऱ्यांपैकी नव्हता. तो खिडकीकडे आला. ब्लॅक-आऊटच्या त्या अंधारातपण तिखट नजरेच्या सरदारजीनं गाडीतल्या एकटचा प्रवाशाला पक्कं ओळखलं.

तो दचकलाच. लगेच खाली वाकून त्यानं नमस्कार केला. म्हणाला-- वेशक! पाह्यलंच नाही इतका वेळ! गुस्ताखी माफ करो!

मोठा कर्तबगार माणूस! त्यांना थोडावेळ थांबायला सांगून तो फटफटीवर बसून अदृश्य झाला.

दहाएक मिनूटांतच परतला तो स्वत:ची गाडी घेऊनच. गाडीत चारेक-जण मजूर. नेताजींची गाडी आपल्या गॅरेजमध्ये दुरुस्तीकरता ढकलत न्यायला म्हणून. मग स्वत:च्या गाडीनं त्यानं नेताजींना घरी पोचवलं होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठच्या आतच तो नेताजींची गाडी घेऊन हजर झाला.

नेताजींची न्याहरी नुकतीच उरकली होती. गाडीचा आवाज ऐकून नेताजी व्हरांड्यात आले. तेवढ्यात त्यांना पायऱ्या चढत असलेला हरगोविंदसिंग दिसला.

—काय एवढ्यातच दुरुस्त झाली-पण?

—जी हाँ!

—काय खर्च आला दुरुस्तीला?

लगेच सरदार हरगोविंदसिंगनं हात जोडले. अन् तो गप्पच राह्यला.

नेताजी म्हणाले—वा! असं कसं? हा तर तुझा धंदा आहे बाबा. काय खर्च झाला असेल तो पण घेणार नाही म्हंजे काय?

हात जोडलेलेच ठेवून सरदार हरगोविंदसिंग म्हणाला—नेताजी, तुम्ही तर आझादीच्या लढाईत सगळयांच्याचकडनं दान घेताय् ना ?

—हो घेतोय् ना ! पण तुझ्यासारख्या मोठ्या व्यापाऱ्याकडनं एवढसं दान घेतलं तर तुझाच अपमान होईल ना ?

—बेशक ! सांगा, किती देऊ मी ?

—ते मी कसं सांगू ? आझादीच्या लढाईत आपण किती द्यायला हवेत ते तर तुझं तूच ठरवणार.

काही न बोलता हरगोविंदसिंगनं हिप-पॉकेटमधनं चेक बुक न् पेन काढलं. फराटे मारून चेक लिहून नेता जींच्या पायाशी ठेवला.

दहा हजार डॉलरचा बेअरर चेक !

नेताजी हंसले.

म्हणाले—घरी गल्यावर तुझ्या हिशेबाच्या वहीत लिहून ठेव—माझ्या गाडीदुरुस्तीकरता जमा खाती मायनस दहा हजार डॉलर !

सरदारजी दिलखुलास हंसला. त्याच्या त्या दाढीमिशांच्या जंगलातनं पण त्या हंसण्याची मंद छटा त्याच्या चेहऱ्यावर पसरली.

हरगोविंदसिंग नमस्कार करून परत फिरला. जाताना रसीद पाठवून द्यायला सांगून गेला.

दुसऱ्याच दिवशी हा आपला परत हजर.

—माझी एक अर्जी आहे गरीबपरवर !

सगळयांची अर्जी ऐकायला नेताजींची तयारी असायची.

म्हणाले—ठीक. बोल.

खूप आढेवेढे घेत, वळणं घेत घेत हरगोविंदसिंगनं अत्यंत नम्रपणानं जे काही सांगितलं, त्याचा मुद्दा असा होता की—वर्षभरामागंपण मला आझाद हिंद सेनेच्याकडनं न् जपानी सैन्याकडनं कामाच्या खूप ऑर्डरी मिळायच्या. गाड्या दुरुस्तीचं काम. सर्व्हिसिंग. पेट्रोल पुरवायचं काम. पण ते सगळं अचानकच बंद झालंय्. सध्या सगळ्या कामांच्या ऑर्डरी मलाया ऑटोमोबाइल्सकडे जाताय्त.—अन् मलाया ऑटोमोबाइल्स म्हंजे सिंगापुरातला हरगोविंदसिंगचा एकमेव प्रतिस्पर्धी होता !

मलाया ऑटोमोबाइल्सचे मालक होते ब्रिजलाल जयस्वाल. सिंगापूरचा प्रचंड धनाढ्य गृहस्थ. करोडो रुपयांचा धंदा चालायचा त्यांचा. टोकिओ–बँकॉक–सिंगापूर–रंगून इतक्या मोठ्या भागात त्यांचा कारभार चालायचा युद्धाच्या आधी. अजूनसुद्धा पूर्व आशियातल्या बऱ्याच ठिकाणी त्यांची मक्तेदारीच असल्यासारखी होती. जयस्वाल म्हंजे सिंगापूरचं प्रख्यात चेट्टियार घराणं होतं.

—पूर्वी तुला ऑर्डर्स मिळायच्या. आता मिळत नाहीत. अशी अचानक तुझी हकालपट्टी काय म्हणून झाली ?

—तेच मलापण माहीत करून घ्यायचंय् सर. माझी चूक काय आहे ते.

—ऑर्डर्स मिळणं कधीपास्नं बंद झालं ?

—बेचाळीसच्या मे महिन्यापास्नं.

तुम्ही इथं यायच्या आधी तेरा महिने.

—ठीक आहे. मी तपास करून बघतो. तू आठवड्यानं परत भेट.

नंतर लगेचच नेताजींना तीनेक दिवसांकरता कुआलालंपूरला जावं लागलं. जायच्या आधी त्यांनी तपास करायचं काम माझ्यावर न् मेजर रावतांच्यावर सोपवलं. मेजर रावत म्हंजे नेताजींचे ए-डी-सी. त्यांनी परत प्राथमिक तपासणी करून रिपोर्ट तयार करायला मला सांगितलं.

नीट व्यवस्थित काम झालं, की नेताजी खूष व्हायचे. म्हणून मी ठरवून टाकलं, की जी काय माहिती मिळेल ती नोटशीटवर स्वच्छ लिहून काढायची.

पहिल्यांदा गेलो इंजिनियरिंग कोरच्या ऑफिसमधे. दर महिन्याला किती पेट्रोलची खरेदी होते, कोणकोणत्या जातीच्या किती गाड्या आहेत, सिंगापूर हेडक्वार्टर्समधे, बाहेरच्या किती गाड्या तात्पुरत्या म्हणून इथं असतात, त्यांची सरासरी काय पडते, ह्या गाड्यांच्या दुरुस्तीकरता महिन्याकाठी साधारण-पणानं किती खर्च येतो, ही दुरुस्ती कोण करतं, सप्लाय-ऑर्डर कोणत्या कंपनीला मिळते, आधी ही ऑर्डर कुणाकडे जायची—वगैरे-वगैरे सगळी माहिती मी तिथनं गोळा केली.

तपास केल्यावर लक्षात आलं, की हरगोविंदसिंगनं सांगितलं होतं ते खरंच होतं. बेचाळीस सालच्या जूनच्या आधी महिन्याकाठी किमान आठ ते दहा हजार डॉलर्सची ऑर्डर मिळायची त्याला. पण बावीस जूनपास्नं मात्र त्याला एकही ऑर्डर मिळालेली नाही.

नाइलाजानं आणखी खोलात शिरावं लागलं. सिंगापूर ऑटोमोबाइल्सला काय म्हणून एकदम बाद करण्यात आलं—हे काही कुणालाच सांगता येईना.

जुने कागदपत्र बघायला सुरुवात केली. अवघ्या दीड वर्षापूर्वीची तर गोष्ट. फार धुंडाळावं लागलं नाही. सिंगापूर ऑटोमोबाइल्सची फाईलच सापडली.

स्वत: जनरल मोहनसिंगची ऑर्डर होती — सिंगापूर ऑटोमोबाइल्सला इतःपर आझाद हिंद सेनेची काहीही ऑर्डर जाता कामा नये.

ह्या ऑर्डरची एक प्रत त्यांनी जपानी किकान ऑफिसलापण पाठवली होती. सोबत अशी विनंती, की जपानी सैन्यानंपण ह्या फर्मला काही ऑर्डर देऊ नये.

कारण? कारणपण त्यांनी दिलं होतं — सिंगापूर ऑटोमोबाइल्सचा मालक सरदार हरगोविंदसिंग हा संशया-स्पद इसम आहे. प्रत्यक्ष पुरावा हाती आला नसला तरी अंदाज असा आहे, की तो शत्रूशी हातमिळवणी करून आहे.

ह्या गुप्त फायलीसकट मी माझा रिपोर्ट देऊन टाकला नेताजींचे ए-डी-सी मेजर रावतांना.

सगळे कागद उलटून-सुलटून ते म्हणाले — खूपच गोळा केलंस तू. ह्याच्यापेक्षा जास्ती माहिती कसली मिळते आता!

मी म्हणालो — ह्याच्यापेक्षा जास्त माहिती आता मिळालीच तर खुद्द हरगोविंदसिंगकडनंच मिळेल. सरदारजी धंद्यात चांगलाच मुरलेला आहे. दाखवतोय् मात्र असं, की आपण अगदी अडाणी आहोत. आपल्याला का म्हणून वगळलं काही कल्पनाच नसल्यासारखं पण खरंतर त्याला सगळंच ठाऊक आहे. आझाद हिंद सेनेला आपला संशय का आला ते त्याला ठाऊक असायलाच पाहिजे.

— तसं त्याला माहित असेलच रे. पण ते तो कबूल कसाकाय करेल ?

— हो मलापण तसंच वाटतंय्. तो काही कबूल करायचा नाही. पण तुम्ही म्हणत असाल तर मी विचारून बघतो त्याला ?

— काय विचारतोस ? तू कसलं संशयास्पद काम केलं होतंस ?

— नाही नाही, तसं कसं विचारीन मी ? म्हंजे मग सरदारजी चाटच पडेल. पण जरा आडवळणानं विचारलं तर—

रावत हंसले.

म्हणाले — ठीक आहे तू बघ विचारून. सरदारजी बाबा पक्का इसम आहे. तो तुझ्यापेक्षा आडवळणानं उत्तर देईल. अजिबात भांडवल जवळ नसतानादेखील केवढा मोठा धंदा उभारून बसलाय्, बघितलंस ना ?

ते खरंच होतं. पण तरीदेखील मी हरगोविंदसिंगकडे गेलो होतो. भयंकर कुतुहल वाटायला लागलं होतं मला. ह्याला हा परीस कसा काय सापडला ? निव्वळ सात वर्षांत फकिराचा राजा झाला की हा गृहस्थ ! अन् तरी वयानं आपल्यापेक्षा लहान असेल बहुतेक.

त्याच दिवशी संध्याकाळच्या सुमाराला गेलो.'

ओळखविळख द्यावी लागली नाही. सगळी माहिती त्याला आधीच होती. मला पाहुचल्याबरोबर विनयानं वितळून गेला हरगोविंदसिंग. अत्यंत आदरानं त्यानं मला आपल्या खास कमऱ्यात नेलं.

आडवंतिडवं शिसवीचं सेक्रेटरिएट टेबल. मऊ सोफा. हरगोविंदसिंगची स्वत:ची खुर्ची मात्र लाकडी. ताठ पाठीचीच. कमऱ्यातलं सामान सुंदर पण अस्ताव्यस्त.

टेबलावर पेपरवेट म्हणून वापरायला काही बिघडलेले मोटर-पार्टस विखरून ठेवलेले. गच्चीत काही दुर्मिळ जपानी ऑर्किड. पण ते ठेवलेले मात्र पेट्रोलच्या फुटक्या कॅन्समधे ! एवढंच काय पण पश्चिमेकडनं ऊन येऊ नये म्हणून पडदा लावला होता, तो पडदा नव्हता मोडीत निघालेल्या जीपचं कव्हर पडदा म्हणून लावलेलं होतं.

सरदारजी भारी कंजूष होता बहुतेक. किंवा मग त्याला टेस्ट-बीस्ट फारशी नव्हती.

भिंतीवर काही फ़ोटो टांगलेले — जपानचा राजा, गांधीजी न् नेताजी. हे सगळे फोटो नुक्तेच इथं लावलेले आहेत हे उघड लक्षात येत होतं. दोनेक वर्षांमागं इथं बहुतेक क्वीन व्हिक्टोरिया, जॉर्ज द सिक्स्थ किंवा प्रेसिडेंट रुझवेल्टचे फोटो लावलेले असतील. बारा

यईल तशी पाठ फिरवण्यात हरगोविंद-सिंग वस्ताद होता.

कमऱ्यात आणखी दोघंजण बसलेले होते. सूटबूटवाले. कपड्यावरनंच ओळखता येत होतं की हेपण चांगले धंदेवालेच आहेत.

अत्यंत विनयानं हात जोडून सरदार-जीनं माझी ओळख करून दिली—हे प्रत्यक्ष नेताजींचे कॉन्फिडेन्शियल स्टेनो! माफ करा, आता काही मला वेळ व्हायचा नाही आज. मी कामानं जरी व्यापारी असलो तरी जन्मानं भारतीय आहे. अन् मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा अग्रक्रम सगळ्यात आधी! ह्या नेताजींचा दूत——

ते दोघंही उठले. माझ्याशी हात मिळवून म्हणाले——वंडरफुल!

आपण कसल्या पोचलेल्या माण-साच्या तावडीत सापडलोय् हे एव्हाना मला उमगून चुकलं होतं. हरगोविंद-सिंगला पक्कं ठाऊक होतं, की मी त्याच्या धंद्याच्या कामाकरताच आलोय् म्हणून. पण बाहेरच्या लोकांच्यासमोर मात्र ह्या असा आव आणतोय्, की मी म्हंजे भारतवर्षाच्या स्वातंत्र्यावद्दल चर्चा करायलाच ह्याच्याकडे आलोय्!

ते दोघं गेल्यावर सरदारजींनी मला आदरानं बसवलं. चहा घेणार का थंड काही घेणार, फर्माइये म्हणून म्हणाला.

नंतरदेखील लगेचच धंद्याची गोष्ट काढली नाही त्यानं.

अत्यंत उत्सुकतेनं नेताजींच्याबद्दल नाना खाजगी गोष्टी विचारत राहचला. नेताजी काय खातात, किती वेळ झोप-तात, व्यायाम करतात का नाही—वगैरे. जणू नेताजींच्याबद्दल त्याला खरंच प्रचंड कुतूहल वाटत होतं!

मी पक्का समजून होतो, की हे सगळं निव्वळ मला खूष करायला म्हणून तो बोलतोय्. नाहीतर ह्याच्यासारख्या मुरलेल्या धंदेवाल्याला नेताजींची इतकी माहिती मिळवून काय करायचंय्!

काय गंमत आहे बघा. सरतेशेवटी कामाची गोष्ट मीच काढली!

म्हणालो—— मी तुमच्या सप्लाय-बद्दलच्या कामाकरता आलोय्.

मला मधेच अडवून हरगोविंदसिंग म्हणाला—— भास्करनजी, आत्तापर्यंत सप्लाय खूप केला. पुढंपण करायचाय्. ते काही विशेष नाही. आज तुम्ही फक्त नेताजींच्या गोष्टी सांगा. बंगाल के शेर के बारे में! ते घरातनं कसेकाय बाहेर पडले पहिल्यांदा? माझ्या वडलांचं दुकान होतं यदुबाबूंच्या बाजाराशेजारी. नेताजींचं एल्गिन रोड-वरचं घर पाहचलंय् मी! हमरस्त्यावर भलाथोरला वाडा! ते कसे काय——

——ते काही मला पण नीटसं ठाऊक नाही. पण घरातनं ते पळाले हे तर खरंच, नाही का?

——का हो, त्यांना काय योगानं आदृश्य होता येतं का?

मला हंसू आलं.

म्हणालो—— नाही. अशी काही अलौकिक सिद्धी त्यांना प्राप्त नाही. निदान मी तरी तसं काही पाहचलेलं नाही.

——क्या ताज्जुब! माझी मात्र पक्की

खात्री आहे, की ह्या खेपेला ते भारत-वर्ष नक्कीच स्वतंत्र करून टाकतील !

--ते कसं काय होणार ? देशातले बहुतेकच लोक आपापला स्वार्थ तेवढा बघण्यात गुंतलेले आहेत. नेताजी देशा-वरनं आपलं सगळं काही ओवाळून टाकतायत. अन् देशातले लोक मात्र आपल्यापुरतंच पहातायत ! नफा-तोटा, बिझनेस, सप्लायऑर्डर !

बरा घाव घातला आपण असं मला वाटत होतं. पण कसलं काय ! माझ्या म्हणण्याचं समर्थन करायला म्हणून सरदार हरगोविंदसिंग उठून उभा राह्यला ताडदिशी.

म्हणाला--बरोबर आहे तुमचं म्हणणं. ही काही नफातोटा बघायची वेळ नाही !

भलतंच हंसू येत होतं मला. हा काय वेडाबिडा आहे का काय ? किंवा मग एक नंबरचा लबाड ?

मी म्हणालो--बरं, ते जाऊ द्या आता. तुमच्या सप्लाय-ऑर्डरबद्दल बोलू या. मी बघितले कागदपत्र. त्याच्यावरनं तुम्हांला काही ऑर्डर देता येईल असं काही मला वाटत नाही.

हरगोविंदसिंग आपल्याच तंद्रीत होता. माझं म्हणणं त्याला ऐकूच आलं नाही.

एकदम् भानावर येऊन त्यानं विचा-रलं--अं ? काही म्हणत होतात तुम्ही ?

मी परत एकदा माझं म्हणणं सांगितलं.

हरगोविंदसिंगनं ह्या खेपेला मन लावून ऐकलं.

मग त्यानं मलाच प्रश्न केला--का म्हणून ? माझ्या हातनं काय गुन्हा झालाय् ?

--तेच जाणून घ्यायला तर मी इथं आलोय्.

आता हरगोविंदसिंग हंसला.

म्हणाला--यह कैसी बात हुई भास्करनसाब ? मी आरोपी आहे. मी जबानी देईन. मी तयार आहे त्याला. पण तुमचा आरोप काय आहे माझ्या-वरचा ते तर सांगाल ?

माझ्या डोक्यात काय आलं कुणास ठाऊक !

धाडदिशी मी बोलून गेलो--मी जर असं म्हणालो की आझाद हिंद सेनेचा विश्वासघात केलायत तुम्ही--तर तुम्हाला नाकबूल करता येईल का ते ?

--नाही !

--काय नाही ? नाकबूल करता येणार नाही ?

--नाही !

--म्हंजे तुम्ही आमचा विश्वासघात केलायत. होय ना ?

--तुमचा नाही ! बेचाळीस सालच्या जून महिन्यातल्या त्या-काळच्या आझाद हिंद सेनेचा !

--ते एकच. म्हंजेच आमचा !

सरदारजीचा आवाज आता भलताच खंबीर झाला.

--जी नही ! वह बिल्कुल दूसरी बात है !

--ते कसं काय ?

--ते समजावून सांगायचं तर बऱ्याच गोष्टी सांगाव्या लागतील.

--बऱ्याच गोष्टी ऐकायलाच तर

मी आलेलो आहे.

एवढ्यात त्याच्या नोकरानं दोन ग्लास थंडगार सरवत आणून ठेवलं होतं. एक ग्लास मी स्वत:कडे ओढला.

सरदार हरगोविंदसिंगनं स्वत:चा ग्लास उलट आणखी लांब सरकवला.

म्हणाला—तुम्हाला ठाऊक आहे, आझाद हिंद सेना पहिल्यांदा कशी बनली ते? तेव्हाच्या युद्धबंद्यांना काय वाटायचं, ते काय करायचे—माहीत आहे तुम्हाला? तुमचे कर्नल शाहनवाजखान बिरादरी कँपमध्ये काय म्हणाले होते--ठाऊक आहे? कॅप्टन धारगळकर, कॅप्टन बुधवार न् कॅप्टन ताजीजचा काय छळ झाला होता--त अन् तो का झाला होता—माहीत आहे तुम्हाला?

मला खरोखरीच त्यातलं काहीच ठाऊक नव्हतं. त्यानं घेतलेली शेवटच्या तीन जणांची तर नावंदेखील मी ऐकलेली नव्हती.

मग सरदार हरगोविंदसिंगनं मला तपशीलवार त्या सगळ्या मागल्या गोष्टी सांगितल्या. नेताजी पूर्व-आशियात यायच्या आधीच आझाद हिंद सेना कशी बनली त्याच्या गोष्टी—

[ पुढील अंकात चालू ]

## अय्ययो! मदराऽस!

पृष्ठ १९ वरून

रीस होता. तेव्हा, तेथील नव्या रेल्वे-मार्गांचा भूमीपूजन व पहिली कुदळ मारण्याचा समारंभ साजरा करण्यात ते गुंग होते. त्यावेळी रेल्वेमंत्र्यांनी काही योजना जाहीर केल्या. त्या अशा:— देशातील प्रमुख ५० स्टेशन्सवर, प्लॅट-फॉर्मवरच बँका उघडण्यात येतील, अर्ध्यातासाचे अंतराने एकाच मार्गावरून दोन गाड्या सोडण्यात येतील व त्या एका आड एक (अल्टरनेट) स्टेशन्सवर थांबतील, डायनिंग कारमधील जेव-णाच्या निकृष्टतेबद्दल तक्रारी खूप वाढल्या म्हणून मधल्याच एखाद्या स्टेशनवर गाडी 'जेवणासाठी' जादावेळ थांबेल, पोस्टाचे स्पेशल डब्याप्रमाणे बँकांचे चेक्स क्लिअरिंगसाठी खास डबा जोडण्याचीही योजना पुढे आलेली आहे. ... आणि...

करुदेत बिचारे! काहीही करा! तुम्ही कराल तेवढं कमीच आहे. फक्त दरवाढ करू नका हीच प्रार्थना...आणि हा, त्या संपवाल्यांनाही प्रार्थना बाबारे असा फसणारा संपही करू नका, म्हणजे तुमच्याच भल्यासाठी बरे का!

□ □ □

मध्यंतर

'पद्मिनी'कार भाव्यांचे नवे नाटक

# अकुलिना

पुष्पा भावे

एखादा विशिष्ट अनुभव जेव्हा एका विशिष्ट वाङ्मयीन आविष्कार माध्यमातून व्यक्त होतो त्यावेळी त्या अनुभवाला तोच आविष्कार अपरिहार्य आहे असे आपण मानतो आणि तरी-देखील वेगवेगळ्या कथा, कादंबऱ्यांची नाटकात रूपांतरे होताना आपण पाहतो. श्री. गो. नी. दांडेकर, श्री. श्री. ना. पेंडसे, श्री. व्यंकटेश माडगूळकर अशा अनेक नामवंत साहित्यिकांनी आपल्या कथात्मक साहित्याला नाट्यरूपे देण्याचे यत्न आजवर केलेले आहेत. बहुतेक वेळेला अशी रूपांतरे यशस्वी होत नाहीत असे दिसते. बहुधा एका पद्धतीच्या संकल्पनेनुसार आकारित झालेला अनुभव मोडून पुन्हा मांडताना त्यातील नाजुक जागा हरवत असाव्यात. 'गारंबीचा बापू' हे पेंडश्यांचे नाटक पाहताना मूळ कादंबरीतला अनुभव अत्यंत भडक होतो असे वाटते. अनेकदा आपण एखादी कादंबरी वा कथा नाट्यपूर्ण आहे असे म्हणतो त्यावेळी त्यातील 'नाट्य' आणि नाटक हे आविष्कारमाध्यम यामधील अंतर अनेकदा डोळ्याआड होत असावे. मुळातच मराठी नाटके वृत्तीने कथनात्मक असतात. त्यात कादंबरीचा आधार घेतला की केवळ कथानकाची दृश्यात्मक-संवादात्मक मांडणी करण्याकडे कल होतो.

श्री. पु. भा. भावे हे कथाकार, कादंबरीकार म्हणून जसे महाराष्ट्राला परिचित आहेत, त्याचप्रमाणे नाटककार म्हणूनही प्रसिद्ध आहेत. रंगभूमीवर ज्या काळात नव्याने उत्साहाचे वारे नुकते वाहू लागले होते त्यावेळी त्यांचे 'स्वामिनी' हे नाटक गाजले होते. हे जरी खरे असले तरी त्या नाटकापासून तो 'असंगाशी संग' या नाटकापर्यंत भाव्यांच्या नाट्यरचनेचा विचार करता असे लक्षात येते, की रंगभूमी या माध्य-

माचे या लेखकाला फारसे भान नाही. परिणामाचा विचार करताना हा नाटककार आपल्या प्रेक्षकांच्या प्रत्यक्ष प्रतिक्रियांचा, त्यांच्या आवडीनिवडीचा चलाख व हिशेबी उपयोग करतो. विशिष्ट सामाजिक आकसाने अनुभव मांडण्याच्या पद्धतीमुळेही त्यांच्या नाटकात अनेक दोष निर्माण झाले आहेत. श्री. पु. भा. भाव्यांच्या चित्रपटकथेतील 'नऊवारी'चे तत्त्वज्ञान आपल्याला परिचितच आहे. मराठी प्रेक्षक हा तसा भोळाभावडा असल्यामुळे नऊवारी लुगडे, संस्कृती, तुळशीवृंदावन वगैरे नाटकात वा चित्रपटात पाहिले की तो हेलावून जातो. म्हणजेच तो आदर्श रसिक नसतो. कारण त्याची प्रतिक्रिया नाट्यकृतीमुळे वा नाट्यनिर्मितीमळे निर्माण होत नसून काही अन्य अप्रस्तुत घटकांमुळे निर्माण होते. श्री. बाळ कोल्हटकर, श्री. मधुसूदन कालेलकर इत्यादी जे मराठीतील लोकप्रिय नाटककार आहेत, ते सर्वच वरील प्रतीकांचा वापर करीत असले तरी श्री. भाव्यांची नाटके आणि त्यांची नाटके यामध्ये फरक आहे. थांबून विचार करावा इतका महत्त्वाचा फरक आहे.

श्री. पु. भा. भावे यांच्या उत्तरकालातील कथांतून, चित्रपटकथांतून व नाटकांतून जुन्या समाजरचनेचे, निष्ठांचे झेंडे उभारलेले असले तरी त्याला विरोधी चित्र म्हणून (किंवा विरोधाच्या निमित्ताने म्हणा) स्खलनशील व्यक्तींचे, समाजाचे मनसोक्त चित्रण आहे. हे चित्रण वाचताना व पाहताना गरीबांविषयी निर्माण होणाऱ्या श्रीमंती हिंदी चित्रपटांचे स्मरण होते. म्हणजे एका बाजूला ध्येयनिष्ठेचे उदात्त (?) लेखकाचे श्रेय मिळते आणि आडमार्गाने लोकांना गुदगुल्या करणारे असेही काही आणता येते. वर समर्थन करायला विरोधाचे तत्त्व आहेच मदतीला. कोणत्याही लेखनातील प्राथमिक अवस्थेमध्ये दिसणारे—लेखकाने एक पक्ष स्वीकारणे, तत्त्वाच्या विशदीकरणाचा आग्रह बाळगणे, व्यक्तिरेखा गडद रंगात रंगविणे इत्यादी दोष भाव्यांच्या नाटकात आहेतच; आणि या दोषांमुळे नाटक या माध्यमाचे भान अनेक नाटके लिहूनही फारसे निर्माण झालेले नाही.

श्री. पु. भा. भावे यांचे 'पद्मिनी' हे नाटक अलीकडच्या काळात विशेष गाजले. याच नाटकाच्या रचनेत प्रथमतः भाव्यांना नाटकाची थोडी जाणीव प्राप्त झाली आहे असे जाणवले. प्रचारकी थाटाला या नाटकात पुष्कळ वाव असूनही नाटककाराने मूळ नाट्याची फारशी कुचंबणा होऊ दिली नव्हती. त्यामुळे श्री. भाव्यांची 'अकुलिना' ही कादंबरी नाट्यरूपाने सादर केली जात आहे असे ऐकले तेव्हा पुसट अपेक्षा निर्माण झाल्या. या कादंबरीवर आधारलेला चित्रपट काही वर्षांपूर्वी येऊन गेल्याचे स्मरत होते. 'अकुलिना' ही कादंबरी पत्रात्मक आहे. पत्रामधून व्यक्त होणारा अनुभव हा मनोगताच्या स्वरूपाचा असतो. हा अनुभव नाट्यात्मक स्वरूपात मांडणे अवघड असते. परंतु 'अकुलिना' या

कादंबरीतला अनुभव मूळातच बराचसा भडक–भावविवश असा आहे. पत्रांमधून बरेचसे प्रसंगवर्णन आहे; प्रतिक्रियांचे वर्णन येते तेही ढोबळ स्वरूपाचें. सरळ-साध्या स्वभावाचा एक मुलगा प्रेमभंगानंतर स्त्रीद्वेष्टा होतो; आपल्या प्रेयसीने केलेल्या विश्वासघाताचे प्रायश्चित दुसऱ्या एका निरागस मुलीला भोगायला लावतो; आणि ही मुलगी वेश्यापुत्री असल्यामुळे असे करण्यात काहीच दोष नाही असे मानतो; यशाच्या मार्गाने जाऊन जीवनात प्रस्थापित होतो–गुप्त-रोगतज्ञ होतो; आणि ती निरागस मुलगी इतरांच्या पापाचे प्रायश्चित भोगीत गलिच्छ रोगाची बळी होते. तिला इस्पितळात पाहिल्यावर या नायकाची विवेकबुद्धी जागृत होते–तो स्वतःच्या पापाची कबुली देऊ पाहातो. त्याचवेळी ती तरुणी आत्महत्त्या करते. ही कादंबरीची रूपरेषा पाहिल्यानंतर लक्षात येईल की मुळातच त्यातील मानसशास्त्र फार प्राथमिक स्वरूपाचे आहे. तरी पत्रामध्ये फार भडक न वाटणारा भावनांचा उद्रेक नाटकात भडक वाटू शकतो हे लक्षात घेता, मुळातच भडक असलेल्या या कादंबरीचे दृश्यरूप कसे झाले असेल याची कल्पना येईल.

'अकुलिना' कादंबरीचे नाटक कर-करताना मूळ कथा वस्तूला अनावश्यक असे, कादंबरीत नसलेले, अनेक प्रसंग जोडले आहेत. सुरंगाचे घर मधुला दाखविण्याच्या निमित्ताने वेश्येचे घर दाखविण्याचा प्रयत्न, दुसऱ्या अंकात


# राजा शिवछत्रपती

## ब. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपयें

प्रकाशक
## महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान
सातारा

एकमेव विक्रेते
## राजहंस प्रकाशन
पुणे

भावाने सुरंगाला धंदा करायला भाग पाडणे प्रत्यक्ष रंगमंचावर दाखवणे, इत्यादी प्रसंगामुळे मुळातच नाटकी असणारे हे नाटक अधिक नाटकी झाले आहे. तसेच, मूळ कादंबरीत, हिराविषयी मत्सर निर्माण झाल्यामुळे, भावनावेगात सुरंगा मधूच्या मागणीला होकार देते असा प्रसंग आह. नाटकात, तो तिच्या इच्छेखातर तिच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो, गळ्यात हार घालतो आणि ते दोघे शयनगृहात जातात. लाल प्रकाशित खिडकीतून त्यांच्या आकृती दिसतात – इथे प्रेक्षक टाळ्याही देतात. हा प्रसंग हिंदी चित्रपटात नेहमी व मराठी चित्रपटात कधीकधी येणाऱ्या विवाहाच्या पहिल्या रात्रीच्या गोड (!) दृश्यासारखाच आहे. आणि या कादंबरीची नाटक म्हणून पुनर्रचना करताना श्री. पु. भा. भावे यांनी प्रेक्षकांच्या मनाला गुदगुल्या करणारी, त्यांचे कुतुहल शमविणारी अनेक दृश्ये योजली आहेत – जी नाटकाच्या मूळ प्रकृतीशी विसंगत आहेत.

श्री. आत्माराम भेंडे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. पूर्वीच्या 'आय्. एन्. टी.'मधील या आकांक्षी दिग्दर्शकाने गेल्या दहा वर्षात दिग्दर्शित केलेल्या नाटकांची यादी पाहिली तर आपल्याला धक्काच बसतो. प्रायोगिक वा हौशी रंगभूमीवरील तज्ञ दिग्दर्शकांनी व्यावसायीक नाटकांचे दिग्दर्शन अवश्य करावे. त्याशिवाय व्यावसायिक प्रयोगांची अप्रगल्भता नष्ट होणार नाही. परंतु त्यासाठी नाटकांची, संस्थांची, अभिनेत्यांची निवड नको का करायला? एक मात्र खरे, गेल्या वर्षातील भेंड्यांचे नांव झळकवणाऱ्या इतर नाटकांपेक्षा 'अकुलिना'वर त्यांच्या दिग्दर्शनाचे संस्कार अधिक झालेले दिसतात. 'अकुलिना'तील मधु बर्वे आणि सुरंगा शिरोडकर या प्रमुख भूमिका रमेश देव आणि सीमा यांनी केल्या आहेत. रमेश देव हा लोकप्रिय नट आहे. एक मर्यादित कार्यक्षमता त्याच्या ठिकाणी आहे. परंतु त्याचा अभिनय आविर्भावासारखा कृत्रिम वाटतो. मूलतःच त्याचे शरीर कमी लवचिक वाटते. तरी श्री. भेंडे यांनी मधु बर्वेच्या भूमिकेसाठी रमेश देवांना खालच्या पट्टीतील अभिनयाची दीक्षा दिलेली दिसते. त्यांच्या लकबीही कमी झालेल्या वाटल्या. त्यामुळे सुरंगाच्या लाघवी स्वभावाला नैसर्गिक प्रतिसाद देण्याची इच्छा आणि स्वतःला न गुंतवता सुख मिळविण्याचा निश्चय, यातील विरोध त्यांनी मुद्राभिनयाने नेमका व्यक्त केला. मात्र तिसऱ्या अंकातील पश्चातापाची अभिव्यक्ती त्यांनी विलक्षण नाटकीपणे केली. सीमा देव यांनी मराठी चित्रपटातील सोज्वळ दुःखी नायिकेची सांकेतीक भूमिका पुन्हा एकदा सादर केली. त्या सुरंगाच्या भूमिकेत दिसल्या चांगल्या; परंतु नायिकेची भूमिका करताना त्यांनी आपल्या बांध्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

मधु बर्वेला सावध सुखवादाची संथा देणाऱ्या मन्मथ बॅनर्जीची भूमिका श्री.

आत्माराम भेंडे यांनी त्यांच्या नेहमीच्या सफाईने केली. (संस्कृतिवादी लेखकांच्या नाटकात, कादंबऱ्यात, कथेत एखाद्या ला बिघडवणारी माणसे, अनैतिक वर्तन करणाऱ्या तरुणी या बहुधा अमहाराष्ट्रीय असतात !) सनातनी असूनही सुरंगाच्या बाजूला असणाऱ्या, मधूला उपदेश करणाऱ्या मित्राची भूमिका राजा दाणी यांनी केली आहे. परंतु या भूमिकेला फारसा वाव नाही. सुरंगाच्या आईच्या सौ. वसुंधरा पौडवाल यांचा व भावाची बाळ गोसावी यांची भूमिका वातावरण निर्मितीला यथायोग्य होत्या. लोचन फडके मात्र फारच अवघडलेल्या शरीराने रंगमंचावर वावरत होत्या. त्यांचा अभिनय साधारणतः संगीत नाटकाला शोभेलसा कृत्रिम होता.

श्री. बवन प्रभु यांनी नामदेवची भूमिका केली. त्यासाठी 'फर्स' प्रसिद्ध प्रभूंची गरज नव्हती. पूर्वी गुंडाळीच्या पडद्यांचे काळात दुय्यम पात्रांच्या आधारे अनावश्यक विनोदी प्रवेश होत. आज सगळी पात्रे एकाच कक्षेत वावरत असली तरी विनोदासाठी पात्र नेमण्याची रीत जात नाही. एकूण अजूनही आम्ही नाटकात सर्वकाही असावे—भेळेसारखे तिखट-आंबट-गोड खमंग असे मिश्रण असावे असे मानतो.

या नाटकाची निर्मिती मात्र 'अजिंक्य थिएटर्स' या संस्थेने कार्यक्षमतेने केली आहे. मात्र स्वप्नदृश्यासाठी योजलेले नेपथ्य विचित्र वाटते. आणि तिसऱ्या अंकातील डॉक्टरांच्या बंगल्यातील दिवाणखान्याचे दृश्य तर रंग आणि रेषांची काही संवेदना असणाऱ्या माणसाच्या डोळ्यांना दुखापत करील असे आहे. दिवाणखान्यातील पडदे, कोच आणि विभाजक यासाठी मोठ्या चौकटयांच्या डिझाइनचे तीन वेगवेगळ्या रंगाचे पडदे, हॉटेलमधील कोपऱ्यातल्या प्रमाणे दिसणारे जेवणाचे टेबल, प्लॉस्टिकची फुले या सर्वांची गर्दी कुरूप दिसते. श्री. पांडुरंग कोठारे हे नाणावलेले नेपथ्यकार आहेत. त्यांनी असे का करावे कळत नाही.

या नाटकात रमेश व सीमा देव हे लोकप्रिय नटनटी आहेत; नऊवारी साडी, पुरणावरणाचा स्वयंपाक ('सुवासिनी' - स्टाईल), फुलांची रांगोळी आहे; नाटकाच्या अंती न्यायाची कल्पना आहे; वेश्यागृहातील भडक व करुण दृश्ये आहेत. त्यामुळे मराठी, हिंदी चित्रपटांच्या प्रेक्षकवर्गाने हे नाटक पाहायला हरकत नाही. निर्मात्याचे भले होईल अशी चिन्हे दिसत आहेतच.

□ □ □

एक प्रतिक्रिया

# प्रतिद्वंद्वी कोण ?

अशोक राजवाडे

९ सप्टेंबरच्या अंकातला देवीदास बागुलांचा प्रतिद्वंद्वी कोण ? हा लेख वाचला. बागूल एकंदरीत बरेच बोअर झालेले दिसतात. बहुधा त्यांनी 'प्रतिद्वंद्वी'ची इंग्रजी सबटायटल्सविरहित असलेली प्रत पाहिली असावी. प्रतिद्वंद्वीसारखा चित्रपट सबटायटल्सशिवाय समजणं खरंच कठीण आहे. या चित्रपटाचं खरं सौंदर्य त्यातल्या संवादातच साठवलं आहे.

प्रतिद्वंद्वी म्हणजे काय ? प्रतिद्वंद्वी कोण ? या चित्रपटाचा नायक हाच प्रतिद्वंद्वी. मग त्याचा हा लढा—संघर्ष कुणाविरुद्ध चालू आहे ? प्रस्थापिताविरुद्ध ! आणि या प्रस्थापितातला आणि नायकातला संघर्ष हा ह्या चित्रपटाचा विषय आहे. चित्रपटातला नायक तरुण आहे आणि म्हणूनच संतप्त आहे. पण आतून हताश आहे. चे गव्हाराच्या चरित्राच्या पुस्तकासाठी आपलं मेडिकल कॉलिजचं पुस्तक विकून पैसे उभे करणारा, कॉलिजच्या युनियनचं नेतृत्व करणारा नायक नोकरीच्या शोधात वणवण हिंडतो आहे. वडिलांच्या मृत्यूमुळे कॉलिजशिक्षण सोडून देऊन, इंटरव्ह्यू देत भटकतो आहे. आणि हे सर्व १९७१ च्या कलकत्त्याच्या अशांत आणि विद्रोही पार्श्वभूमीवर. ही अशांतता आणि संघर्ष नायकाच्या मनातही पूर्णपणे उमटला आहे. आणि या अशांततेचं, अस्वस्थतेचं दर्शन चित्रपटात शेवटपर्यंत उमटलं आहे. या अस्वस्थतेचा आणि अशांततेचा एकदाचा निकाल लागावा असं त्याला वाटतं पण परिस्थितीच्या चाकात तो तर पूर्णपणे अडकला आहे. तो तर आता काहीच करू शकत नाही. त्याचे विचार जरी प्रगत असले, तरी त्याने जपलेली मूल्यं मात्र आतपर्यंत मध्यमवर्गीयच आहेत. त्याला क्रांती हवीशी वाटली तरी गिलोटिन खाली आपली मान सापडली आहे या भयाण स्वप्नाने तो दचकून जागा होतो. आपल्या साहसवादी भावाच्या त्यागाचं त्याला कौतुक वाटत असतं पण पोलिस त्याला गोळ्या घालतील ही भीती त्याच्या मनात असते. थोडक्यात म्हणजे, नायक अंतर्विरोधाचा एक पुतळा आहे.

शेवटी जेव्हा त्याला नोकरी मिळते आणि खेडेगावातल्या एका लॉजमध्ये तो रहायला जातो तेव्हाचा प्रसंग फारच हृदयस्पर्शी आहे. समोरून प्रेत जात आहे; प्रेतामागचे लोक 'रामनाम सत् हैं' म्हणत चालले आहेत, अशा वेळी नायक विचार करत उभा आहे. आपलं हे द्वंद्व संपलं ! आपण हरलो ! आता आपलं पुढचं जीवन मृत्यूसारखंच आहे, हेच यात व्यक्त करायचं आहे. इथंच चित्रपट संपतो.

या चित्रपटाची अनेक वैशिष्ट्यं आहेत. उत्कृष्ट संवाद हे तर विशेष महत्त्वाचं. पण त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव दाखविण्यासाठी प्रत्येक शॉट परिपूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ, नायकाच्या बहिणीची ध्येय-सतत वरच्या वर्गाशी आपलं नातं जोडण्याची-निरनिराळ्या प्रसंगांतून दाखविली आहेत. तिचा बॉसशी असणारा संबंध, पाश्चिमात्य नृत्याचं शिक्षण घेण्याची हौस, मॉडेलिंग करण्याची इच्छा यातून तिचा मार्ग स्पष्ट होत गेला आहे. नायकाच्या मित्राचं मन बाई-बाटली या सारख्या चैनी करण्यात गुंतलं आहे. त्याच्या भावाने तर साहसवादी मार्ग स्वीकारला आहे. नायकाची प्रेयसी या कशाबद्दलच विचार करायला तयार नाही. संथ, शांत जीवन हेच तिनं गृहीत धरलं आहे. चाकोरीबाहेर ती विचारच करत नाही. नायकाच्या आजूबाजूला असणारी ही माणसं ही जणू नायकाच्याच मनाचे निरनिराळे कप्पे आहेत.नायकाला बरंच काही कळतं आहे आणि म्हणूनच तो कायम अंतर्मुख होतो आहे, अस्वस्थ होतो आहे. त्याच्या जीवनपद्धतीनं आणि समाजरचनेनं त्याच्या आतल्या माणसाला खच्ची करून टाकण्याचा चंगच बांधला आहे. इंटरव्ह्यूच्या वेळी उभ्या असणाऱ्या उमेदवाराच्या जागी म्हणूनच नायकाला मधूनच हाडाचे सांगाडे दिसू लागतात.

थोडक्यात म्हणजे एका मरणपंथाला लागलेल्या समाजाचं आणि त्यातल्या अंतर्द्वंद्वाचं हे एक सुरेख चित्रण आहे— कारण ते भीषण आहे. चित्रपटातल्या काही गोष्टींचा उल्लेखच करायचा झाला तर नायकाला पडलेली स्वप्नं उदाहरणादाखल देता येतील. किती चित्रविचित्र, कॉम्प्लिकेटेड परंतु तरी मनाला पटणारी ! खरीखुरी स्वप्नं वाटणारी !

किंवा भूतकाळात प्रवेश करणारं नायकाचं मन ! काहीतरी झुळझुळत गेलं आहे अशा होणाऱ्या आठवणी ! अरे, हीच ती आपली बहीण ना ? नायकाला क्षणभर खरं वाटत नाही.

आणि जाता जाता, इंटरव्ह्यूच्या वेळचा एक संस्मरणीय संवाद आठवा. ब्रिटिश चाकोरीत वाढलेले अधिकारी नायकाला विचारतात.

'हू वॉज द ब्रिटिश प्राइम मिनिस्टर ॲट द टाइम ऑफ इंडिपेन्डन्स ?' 'इन्डिपेन्डन्स ? हूज इन्डिपेन्डन्स ?' नायक विचारतो.

'ऑफ कोर्स, अवर्स !' आपल्याकडे बोट दाखवून ते अधिकारी म्हणतात. भारतीय स्वातंत्र्यावर इतकी अर्थपूर्ण टीका तुम्ही ऐकली आहे का ?

माझी श्री. वागुलांना विनंती आहे, की जमल्यास त्यांनी इंग्रजी सबटायटल्ससह 'प्रतिद्वंद्वी' पहावा. वरवर प्रायोगिक वाटणाऱ्या, पश्चिमेकडून आयात केलेल्या आणि भारतीय जीवनापासून—सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनापासून—अलग पडलेल्या आपल्या तथाकथित 'न्यू वेव्ह' सिनेमा आणि नाटकांपेक्षा प्रतिद्वंद्वी त्यांना अधिकच जवळचा वाटेल.

□ □ □

## दारिद्र्याचे आव्हान

पृष्ठ १४ वरून

विश्लेषण टाळावे. बहुसंख्य लोकांची वर वर्णन केलेली स्थिती! विकासाचा रोध करणारी लांचलुचपत ही केवढी मोठी शक्ती आहे याचे आकलनच कुणाला होत नाही. श्री. मिर्धाल यांनी अविकसित राष्ट्रांच्या विकासाबाबतच्या आपल्या उपपत्तीत लांचलुचपतीचे साकल्याने विश्लेषण केले आहे हेच या महान् अर्थज्ञाचे महत्त्व आहे. लाचलुचपत म्हणजे फक्त माणसाच्या मनातल्या नीतितत्त्वांना आलेली क्षणिक डुलकी नव्हे! अनेक आर्थिक आणि राजकीय गोष्टींशी कार्यकारणभावाने संलग्न असलेली आणि मानवीजीवनावर भयंकर परिणाम करणारी ती गोष्ट आहे. सर्व प्रकारच्या योजना आखण्यात आणि पार पाडण्यात, लांचलुचपत मध्ये आडवी पडते. अयोग्य वाट दाखवते. योग्य निर्णय रोखून धरते. अंमलबजावणी अडवून धरते. सामाजिक शिस्त निर्माण करणारे सारे प्रयत्न अडथळे उभे करून उधळून देते. मग योजनेत अंतर्भाव न झालेल्या उद्योगांना 'लायसेन्सिस्' मिळतात, अनधिकृत गोष्टी कुत्र्याच्या छत्र्यांसारख्या उगवतात सामाजिक न्याय रसातळाला जातो. आर्थिक आणि राजकीय पिळवणुकीला मोकळे रान मिळते!

विकासमार्गातील ही धोंड निर्धाराने बाजूला सारल्याशिवाय अविकसित राष्ट्रांचा विकास व्हायचा नाही. नव्हे त्यांचे विघटन मात्र संभवेल. विकसनशील देशात लांचलुचपत टाळता येणार नाही ही गोष्ट श्री मिर्धाल यांना मान्य नाही. लांचलुचपतीविरुद्ध युद्धपातळीची मोहीमच आखल्याशिवाय मागासलेल्या देशाना उज्वल भविष्याची आशाच करायला नको, असे मिर्धाल यांचे स्पष्ट मत आहे.

अनेक अर्थज्ञांना न पचणारी, साचेबंद संकेताबाहेर जाणारी अशी शिफारस मिर्धाल परखडपणे मांडतात. कसली झापडे लावणे त्यांना मान्य नाही. अंगबचावूपणा रुचणार नाही! त्यामुळे सांकेतिक अर्थशास्त्रात न बसणाऱ्या पण विकासमार्गाशी संलग्न असलेल्या कितीतरी गोष्टींचा ते आपल्या औपपत्तिक विश्लेषणात समावेश करतात. मागासलेल्या देशांची समाजरचना, राजकीय संघटना, शिक्षणव्यवस्था, शास्त्रीय व तांत्रिक संशोधनाचे मार्गदर्शन, धर्म, ग्राम-व्यवस्था, नोकरदारांची चौकट, बुद्धिमंतांची वर्तणूक, सामान्यजनतेच्या वृत्तीप्रवृत्ती अशा विविध गोष्टींचे विश्लेषण इथे स्पष्टपणे करण्यात आले आहे. स्वप्नाळू विचार, निष्क्रीय सौजन्य, कुणी दुखावेल म्हणून न बोलणे, प्रतिकूल गोष्टीबद्दल मौन पाळणे, असला बर्नार्ड शॉ म्हणतात तसला, सांकेतिक ढोंगीपणा करण्याची फॅशन असलेल्या या युगात श्री. मिर्धाल यांची स्पष्टपणे विचार मांडण्याची धाटणी आणि निःसंग संन्याशाचे धैर्य वाखाणण्यासारखे आहे.

त्यामुळे, जिथे कम्युनिस्ट, धर्माच्या अनिष्ट परिणामाबाबत मूग गिळून स्वस्थ बसायचे शिकले त्या युगात, 'धर्म म्हणजे सामाजिक निष्क्रीयता पोसणारा फार मोठा घटक असून तो, रूढींनी साचेबंद केलेली समाजाची स्तरबद्ध धारणा जोपासतो. समाजातील खालच्या थरातील लोकांची चाललेली ससेहोलपट ही दैवाधीन असून त्याविरुद्ध बंड करून उठणे हे देव-न्यायाविरुद्ध ठरेल अशी तो त्यांची समजूत करून देतो.' असे विचार मांडायला आगळे धैर्यच हवे.

काही शतकापूर्वी, ज्या परिस्थितीत आणि ज्या पद्धतींनी पाश्चिमात्य राष्ट्रांनी आपला विकास करून घेतला, तशी परिस्थिती आजच्या विकसनशील देशात नाही. गेल्या दोन शतकात कामगार जगतात जी जागृती झाली आहे. तीमुळे तशा पद्धती अवलंबिणे विकासशील राष्ट्रांना आज अशक्य आहे. पण दोन परिस्थितीतील या फरकावर सायमन कुझनेट्स् या अर्थज्ञाशिवाय कुणाही अर्थज्ञाने बोट ठेवलेले नाही. या परिस्थितीतील फरकाकडे दुर्लक्ष करूनच ही मंडळी आपली विकासाची उपपत्ती मांडतात पण, हवामान, नैसर्गिकसाधनसंपत्ती, माणसे व जमीन यांचे प्रमाण, लोकसंख्येचा स्फोट, निर्यातवाढीची शक्यता, राजकीय व सामाजिक संस्था, वृत्ती-प्रवृत्ती, धर्माचे अनन्य साधारण स्थान, शैक्षणिक मागासलेपणा, या सर्व बाबतीत जिथे पाश्चिमात्य राष्ट्रांना योग्य परिस्थिती गवसली तिथे विकासशील राष्ट्रांना प्रतिरोध होत आहे. ही गोष्ट श्री. मिर्डाल यांनी स्पष्टपणे मांडली आहे. मूलभूत आर्थिक सुखसोयींचा ढाचा तयार झाला की संस्था, वृत्तीप्रवृत्ती आपोआप बदलतात हा मार्क्सीस्टांचा दावा मिर्डालना मान्य नाही. उलट मागासल्या देशात राजकीय व सामाजिक संस्था व जनतेच्या वृत्तीप्रवृत्ती बदलल्यावाचून मूलभूत आर्थिक ढाचा निर्माण होणे कठीण आहे असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले आहे. भारतीय लोक वृत्तीने आळशी आहेत. दारिद्र्याच्या गर्तेत राहायची त्यांना इतकी संवय लागून गेली आहे की ती मंडळी दारिद्र्यातून बाहेर पडायची इच्छाही करीत नाहीत! ठेविले अनंते तैसेचि राहणारी ही जनता! तिला विकासाची हुंकाच नाही!

**विकास सूत्रे**

या पार्श्वभूमीवर, भारतासारख्या देशात विकासाला गती द्यायची असेल तर—

१ : सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे ध्येय प्रत्यक्षात उतराधले पाहिजे.

२ : शेतीमध्ये मानवी श्रमांचा पुरेपूर उपयोग होईल अशा उत्पादनपद्धती अवलंबिल्या पाहिजेत. आज शेतीवर ७०–७२% माणसे आहेत पण त्यातल्या निम्म्याहून अधिकांना कामच नाही!

३ : संततीनियमनावर विशेष जोर देऊन लोकसंख्या रोधली पाहिजे.

४ : देशातील शिक्षणव्यवस्था

विकासकार्याशी संलग्न केली पाहिजे.

५ : लाचलुचपत आणि वशिलेबाजी निपटून काढून सामाजिक जीवनात शिस्त आणली पाहिजे.

सांकेतिक अर्थशास्त्र, विकास आणि समता या गोष्टींमध्ये विरोध असतो असे मानते. उत्पन्नाच्या व संपत्तीच्या विषम विभागणीतूनच आर्थिक विकासाला भांडवलपुरवठा होतो. देशाची आर्थिक उन्नती झाली की, कमी उत्पन्न गटातील लोकांचीही परिस्थिती सुधारते. पाश्चिमात्य देशात अगर अलिकडच्या काळात जपानसारख्या देशात, औद्योगीकरणाच्या अवस्थेत संपत्तीची अशीच विषम विभागणी प्रत्ययाला आली होती. श्री. मिर्धाल यांनी संपत्तीच्या या विषम विभागणी उपपत्तीला कडाडून विरोध दर्शविला आहे. अगदी निराळचा परिस्थितीत अनुभवाला आलेल्या या ऐतिहासिक गोष्टी सिद्धांत म्हणून मान्य होण्यासारख्या नाहीत. सामाजिक आणि आर्थिक विषमता ही मागासल्या देशांच्या दारिद्रचाचे कारण असल्यामुळे या दोन्ही क्षेत्रात समता प्रस्थापित केल्यावाचून विकासमार्ग मोकळा होणार नाही असे मत त्यांनी ठासून मांडले आहे.

उत्पन्नाच्या विषम वाटणीतूनच भांडवली बचत शक्य होते ही गोष्ट मागासलेल्या देशांना लागूच पडत नाही. राजेरजवाडे, जमिनदार, उसवाले, साखरकारखानदार, श्रीमंत शेतकरी, आणि इतर श्रीमंत कारखानदार मंडळी किंवा मंत्री जिथे लक्ष भोजनावर, राजेशाही शिकारीवर, अलिशान बंगल्यावर, भारी इंपोर्टेड मोटारींवर आपल्या संपत्तीची उधळण करताना दिसतात, डामडौली भांडवल गुंतवणीत मोठेपणा मानतात, परदेशी बँकांतून कोटचावधी रुपयांची ठेव ठेवतात, तिथे वरील मुद्दा अगदीच पोचट ठरतो.

ज्या देशातील ५० टक्क्यापेक्षा अधिक लोकांना दोन वेळ पुरेसे खायला मिळत नाही, खाण्यात सकसपणा असत नाही, जी माणसे मरत नाहीत म्हणूनच जगतात असे म्हणायचे, आरोग्य, शिक्षणाच्या सोई या गोष्टी ज्यांच्यापर्यंत पोचल्याच नाहीत, गलिच्छ परिसरातील घाणेरडचा बिळातून राहाणाऱ्या या मानव देहधारी प्राण्यात काम करण्याची इच्छा वा ताकदच नाही, तिथे विषमता पोसून उभारलेल्या श्रीमंतांच्या हवेल्या पाहून उत्पादकता वाढणार नाही ! इथे आर्थिक विषमता, सामाजिक विषमता पोसते आणि सामाजिक विषमता आर्थिक विषमतेला आपंगिते. हा अन्योन्य कार्यकारणभाव पाहिला तर या देशात समता जोपासूनच उत्पादन वाढेल असे म्हणायला प्रत्यवाय नसावा. शिवाय अशा समतेला सामाजिक न्यायाच्या दृष्टीने खूपच मोठे मूल्य नाही का ? या राज्यात आपल्याला न्याय मिळतोय् ही जनसामान्यांना होणारी जाणीव राष्ट्रीय एकात्मता पोशील की नाही ? अशा तऱ्हेचे विचार मांडून श्री. मिर्धाल यांनी सामाजिक व आर्थिक समतेचा जोरदार पुरस्कार आपल्या ग्रंथातून केला आहे.

पण समतेचा असा पुरस्कार करीत असताही भारतात वा आग्नेय आशियातील इतर देशात अशी समता प्रस्थापित होईल की नाही याबद्दल मात्र श्री. मिर्धाल साशंक आहेत. कारण सामाजिक व आर्थिक समतेची मागणी ही सामान्य जनतेकडून यायला हवी. सामान्य जनतेने त्या करता उठाव करायला हवा. पण या सर्व देशातील सामान्य जनता राजकीय दृष्टया निष्क्रीय आहे. या भावड्या लोकांना भाषिक राज्यांच्या मागणीकरता अगर धार्मिक वा जातीपातीतील संघर्षाकरता चिथविणे संबंधितांना शक्य होते, पण सामाजिक वा आर्थिक समतेकरता जाणीवपूर्वक शिस्तबद्ध संघर्ष सुरू करणे त्यांच्या आवाक्याबाहेरचे ठरते! इथे अनेक राजकीय उलाढाली होतात, सत्तासंघर्ष चालतात पण ते उच्चवर्गीय व्यक्ती व पक्ष यातले संघर्ष असतात. त्यामुळेच गरिबी हटविण्याकरता बँकांच्या राष्ट्रीयीकरणासारखे उचलले पाऊल, वा जमीनधारणेवर वा शहरी संपत्तीवर मर्यादा घालण्याचे प्रयत्न, चोरवाटा, पळवाटा, सुटी, यांनी ढेपाळण्याचीच शक्यता इथे अधिक असते.

## एकदम सूर

म्हणूनच विकासाच्या योजना राबविल्या जात असतानाच, सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. सध्याच्या संस्था व वृत्ती-प्रवृत्ती याला विरोध करतील. मग विकास नाही का मंदावणार? म्हणून सुधारणा हळूहळू अंमलात आणल्या तर? आग्नेय आशियातील अनुभव असा की हळूहळू टप्प्याटप्प्याने काही हाती लागणार नाही. तडाखेबंद वेगाने नव्या सुधारणा भराभर प्रत्यक्षात आणल्या तर विरोधाला अवसरच मिळत नाही. थंडीच्या दिवसात वर्फासारख्या थंड पाण्यात हळूहळू उतरण्याऐवजी एकदम सूर मारला तर कमी थंडी वाजते ना? तसेच हे आहे. असे करण्याकरता एकतंत्री हुकूमशाही राजवट हवी असेही नाही. बहुमताने निवडून आलेले लोकशाही शासनही हे करू शकेल.

हे परखड विवेचन निराशावादी नाही वास्तववादी आहे. खोटा आशावाद उत्साहवर्धक असला तरी तो टिकावू असत नाही. वास्तवाच्या जाणीवेतूनच योग्य पावले उचलली तर मागासलेल्या देशातील विकासाला गती येणे शक्य आहे, पण त्या करता निश्चयाच्या बळाची व कमालीच्या धैर्याची आवश्यकता आहे.

□ □ □

## विज्ञानेश्वरी

पृष्ठ ३ वरुन

आणण्यापूर्वी आपल्या देशाची आजची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती लक्षात घ्यावी लागते. खरे पाहता आपल्या देशाची सामाजिक आणि आर्थिक स्थिती बदलावी म्हणून आपण वैज्ञानिक शोध आणणार असतो. आणि हे शोध कशा प्रकारचे असावेत हे पुन्हा आजच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. म्हणजे परस्परावलंबी असे एक विचित्र कोडे यातून तयार होते. म्हणजे आपणाला विज्ञान किती माहीत आहे या पेक्षा हा समतोल आपण कसा निर्माण करणार आहोत; आपली योजना आपण कशी आखणार आहोत यावर आपले यश अवलंबून आहे. थोडक्यात हे सारे करणाऱ्यांचे पाय या भूमीत किती खोल-वर रुजले आहेत यावर आपल्या प्रगतीचा आलेख अवलंबून असतो.


आपण सारेजण ही मूलभूत गोष्ट अनेकदा विसरलो आहोत. परकीय तंत्रज्ञ आयात करण्याबाबत आपण सारेजण जणू एकमेकांशी चढाओढ करतो आहोत. एक गोष्ट मला जरा स्पष्टपणे सांगावीशी वाटते. हे परकीय तंत्रज्ञ तुमच्या-माझ्या-पेक्षा फार वेगळे असतात. ते तंत्रज्ञ कमालीचे देशभक्त असतात! तुमच्या देशातील योजना आखताना त्यांचा देश ते कधी नजरेआड करीत नाहीत. माझ्या मते, चीनने या परकीय शास्त्रज्ञांवर बहिष्कार टाकण्यामागचे एकमेव कारण हे आहे. किमान या बाबतीत माओचा चीन आपला गुरू असला पाहिजे. मी तुम्हांला एक मजेशीर आव्हान देतो. माझ्या भारतातील अनेक प्रकल्प परकीय तंत्रज्ञांनी आखलेले आहेत. त्यातील किमान एक प्रकल्प मला असा काढून दाखवा, की जो उभारताना परकीय कंपन्यांच्या वा परकीय देशाच्या फायद्याचा विचार झालेला नाही! आणि हे केवळ एवढ्यावरच थांबत नाही. अनेक सामाजिक दडपणांना आणि राजकीय हितसंबंधांना हे प्रकल्प नित्य-नेमाने बळी पडत असतात.

निदान आज तरी मला थोडे स्पष्ट-पणे बोलू द्या. या देशातील गरीब अर्ध-शिक्षित, अर्धपोटी जनतेने खूप काळ काही सोसले आहे. निदान यापुढे तरी एक करा. या भूमीत ज्यांचे पाय रुजलेले आहेत अशा शास्त्रज्ञांच्या संचा-कडून यापुढे येणारी प्रत्येक योजना तपासून घ्या. हे तुम्ही कराच असा माझा आग्रह नाही. पण हे तुम्ही करणार नसाल तर तुमच्या या योजना आणि या योजना राबवणारे शास्त्रज्ञ यांची होळी करीत या देशातील जनतेचे थवे एक वेळ बाहेर पडतील. चीनच्या सांस्कृतिक क्रांतीनेही पाहिले नाहीत असे चमत्कार या भूमीत तुम्हांला पाहावयास मिळतील!'

□

आकृती क्रमांक
१ अ

आकृती क्रमांक
१ ब



## 'रॉक अॅन्ड रोल'चा परिणाम

मिसेस डोरोथी. अठ्ठेचाळीस वर्षांची एक गृहिणी. आठ मुलांची आई ! आपल्या मुलांच्या बरोबरच डोरोथी बाईनी पण कॉलेजात प्रवेश केला.– बाईना केवळ पदवी नको होती. त्यांना शास्त्रशुद्ध प्रयोग करण्याच्या पद्धती शिकावयाच्या होत्या. स्वतःच्या मनाशी

बांधलेले काही आडाखे, प्रयोगाच्या निकषावर घासून पुसून घ्यावयाचे होते. —आई म्हणून डोरोथी बाईंनी एक गोष्ट हेरली होती. घरात घडणारी प्रत्येक लहानमोठी गोष्ट मुलांच्या आयुष्यावर काही महत्त्वाचे संस्कार करून जाते आणि हे केवळ मुलांच्याच बाबतीत घडते असे नव्हे, घरातील पाळीव प्राणी आणि अंगणातील फुलझाडे पण याच संस्कारावर वाढत असतात.—निदान डोरोथी बाईंची अशी पक्की खात्री होती.

पदवी परीक्षा पास झाल्यावर बाईंनी कोलार्डो विद्यापीठात आपले मुलखा-वेगळे प्रयोग सुरू केले. बाईंनी अनेक फुलझाडे घेतली. त्या फुलझाडांना अन्न, खत, सूर्यप्रकाश, माती सारे एकाच प्रकारचे दिले. मात्र एक गोष्ट वेगळी ठेवली. त्यातील काही फुलझाडांच्या जवळ. कर्णकठोर 'रॉक अॅन्ड रोल' गाण्याच्या तबकड्या दिवसभर लावून ठेवल्या. उरलेल्या काही फुलझाडांच्या जवळ नादमधुर शास्त्रीय संगीताच्या तबकड्या दिवसभर लावून ठेवल्या. (आ. क्र. १ अ)—आणि शास्त्रीय जगाला धक्का बसाव्या अशा काही घटना घडल्या. मृदु शास्त्रीय संगीताच्या जवळ लावलेली रोपटी वेगाने वाढू लागली. त्यांची वाढ जोमदार आणि निकोप होती. विशेष म्हणजे सर्वत्र झाड त्या तबकडीच्या जवळ झुकत होते. जणू त्या रोपट्याला तो आवाज कानात साठवावयाचा होता. किंवा त्या आवाजातून, त्या ध्वनीतून त्या रोपट्याला कसले तरी सामर्थ्य मिळत होते. नेमकी याच्या उलट गोष्ट 'रॉक अॅन्ड रोल' जवळ लावलेल्या रोपट्यांची झाली. ती रोपटी खुजी आणि फिकट झाली. जणू दिवसभर चिडाचीड करणारी मुलेच म्हणाना! —आणि ती रोपे ज्या वेळी तोडली त्या वेळी त्यांची मुळेही अर्धवट वाढ झालेली आढळली. याच्या उलट प्रकार शास्त्रीय संगीत ऐकणाऱ्या रोपट्यांच्या मुळांच्याबाबत आढळला (आ. क्र १ ब).

—आता बाईंच्या या एवढ्या एकाकी प्रयोगावरून काही महत्त्वाचे निर्णय आत्ताच घेता येणार नाहीत हे खरे. अनेक शास्त्रज्ञांनाही या साऱ्या प्रकारात बुवाबाजीचा संशय येतो आहे.—पण बाईंनी आपले प्रयोग विज्ञानाचे सर्व नियम पाळून केलेले आहेत. प्रोफेसर बोरमनसारखा प्रख्यात वनस्पतीशास्त्रज्ञ या प्रयोगाचे प्रथमपासून नीट अवलोकन करीत होता. या दोन जमेच्या बाजू जवळ असल्याने बाई नव्या दमाने आज आपल्या नव्या प्रयोगात मग्न आहेत. त्या म्हणतात, 'माझी पक्की खात्री आहे. आजकालची तरुण पिढी वाहवते आहे, आततायी बनते आहे, त्याचेही प्रमुख कारण 'रॉक अॅन्ड रोल' संगीत हेच आहे. कारण कळत नकळत कानावर पडणारा प्रत्येक ध्वनी हा सजीवाच्या बाबत फार महत्त्वाची कामगिरी पार पाडीत असतो!'

□ □ □

## नेम

पृष्ठ ५ वरून

'तिच्या ××× या शब्दाने (शिवीने) करतात. पण आम्ही तसं नाही लिहिणार! आम्ही लिहिणार– 'प्रस्तुत सभासदाचा भारतीय संस्कृतीवर गाढा विश्वास आहे. अमुक अमुक व्यक्तीविषयी बोलताना ते त्या व्यक्तीच्या माता-पित्यांची दर दोन-तीन वाक्यांनी (गहिवरून) आठवण काढीत असत. 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' या वचनांवरील त्यांचा आदरभाव ठायी ठायी दिसून येत होता!'

असं लिहिलं तर चालेल निळूभाऊ?

असं चालणार असेल तर आम्हाला कळवा. निदान एका वर्तमानपत्रात तरी अशा प्रकारच्या बातम्या छापून आणायची आम्ही व्यवस्था करू!

## श्रीज् पब्लिसिटी

नवोदित लेखकांनो, (–आणि प्रस्थापित लेखकांनोसुद्धा!) तुम्हाला तुमचे पुस्तक गाजवायचे आहे का?–तर मग तुमची काळजी आता दूर झाली आहे. पुण्यात एक नवीन संस्था स्थापन झाली आहे. तिचं नाव आहे 'श्रीज् पब्लिसिटी.' तुम्ही आता एक करायचं. म्हणजे आधी वाङ्मय निर्माण करायचं. मग ते कुठल्याही प्रकारचे असो– पौराणिक असो, ऐतिहासिक असो, सामाजिक असो किंवा अश्लील असो, (–मग तर फारच उत्तम!) एखादा प्रकाशक गाठायचा आणि सरळ श्रीज् पब्लिसिटीच्या कचेरीत जाऊन धडकायचं! मग तुमचे काम संपले! इथून पुढे श्रीज् पब्लिसिटीची चक्रे फिरू लागतील आणि थोड्याच दिवसात तुमचे पुस्तक अखिल महाराष्ट्रातच काय पण अखिल भारततही गाजताना दिसेल! हो, एक सांगायचेच राहिले. या संस्थेचे चालक, मालक आहेत प्रसिद्ध साहित्यिक आनंदी गोपाळ उर्फ श्री. ज. जोशी! तुमचा विश्वास बसत नसेल तर 'ललित' मासिकाचा सप्टेंबरचा अंक पहा. त्यात विद्याधर पुंडलिक यांची प्र. ना. परांजप्यांनी घेतलेली मुलाखत (= फिरकी) प्रसिद्ध झाली आहे. त्यातील पुंडलिकांच्या 'माता द्रौपदी' नाटकासंबंधीची पुढील प्रश्नोत्तरे वाचा.

प्रश्न : 'माता द्रौपदी' गाजविण्यासाठी तुम्ही खास कोणते प्रयत्न केलेत बुवा?

पुंडलिक : या क्षेत्रातील वेरका माणूस–श्री. ज. जोशी यांना मी आपले गाठले. त्यांनी मला आश्वासन दिले, 'तुम्ही काळजी करू नका. 'आनंदी गोपाळ'ची सारी भक्कम प्रचारयंत्रणा मी तुमच्या नाटकामागे उभी करून ते गाजवितो.' त्याप्रमाणे त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी २२ परीक्षणे आणि

एक दोन मुलाखती आणवून हे नाटक नुसते गाजवून सोडले ! 'सोबत 'मध्ये जे एकुलते एक प्रतिकूल मत आले, तीही श्रीजंचीच ' स्ट्रॅटेजी ! एखादे तरी विरोधी परीक्षण असलेच पाहिजे असे त्यांचे मत पडले !'

बसला ना आता विश्वास ?–ही मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर (हीही 'श्रीजं 'चीच स्ट्रॅटेजी !) 'सखाराम बाईंडर ' हे नाटकही आपणच गाजविले असे श्री. ज. सर्वांना सांगत आहेत. ('बक् अप्, बक् अप् ' असे का ओरडता ? श्रीजंवर तुमचा भलताच विश्वास बसलेला दिसतोय् ! ) पण हे काही खरं नाही. संस्थेची पब्लिसिटी वाढविण्यासाठीच ते असं म्हणत आहेत !

जाऊ द्या, आपल्याला काय करायचय् ! आपलं काम झाल्याशी कारण ! तर तुम्ही आता सरळ श्रीजंच्या घरी जा.–थांबा, थांबा, असे पळता काय ? सध्या ते गडबडीत आहेत (दिवाळी अंक ! ) तेव्हा दिवाळीनंतर ते तुम्हांला भेटतील !

## कुणास ठाऊक !

पु. ल. देशपांडे मध्यंतरी कलकत्त्यास बंगाली शिकण्यासाठी गेले होते. बदल्यात (माफक सूड उगविण्यासाठी) ते तेथील काही लोकांना मराठी भाषा शिकवीत ! अशाच एका बाबू मोशायला ते मराठी शिकवीत असत. त्यांनी त्याला 'श्रद्धा ' हा शब्द शिकविला.

एकदा हा बाबू मोशाय पुलंच्या घरी आला. पुलंनी त्याला कालीमातेचे एखादे स्तोत्र म्हणावयास सांगितले. तो काही त्याला तयार होईना.तो म्हणाला, 'स्तोत्र वगैरेंवर आपला विश्वास नाही. आपण ते कधीच सोडून दिलंय.' पण पु. ल. त्याला आग्रह करीतच राहिले. अखेर तो पुलंना म्हणाला, 'बरं बुवा, तुमचं 'श्राद्ध'च असेल तर म्हणीन एकादं स्तोत्र !'

याच बाबू मोशायला यांनी ' कार्यक्रम ' या शब्दाचा उपयोग करायला शिकविला. या गृहस्थाच्या मुलीचे लग्न ठरले. निमंत्रण करण्यासाठी तो पुलंच्या बिऱ्हाडी आला आणि निमंत्रण पत्रिका देऊन म्हणाला, 'लग्न सकाळचं आहे. तेव्हा लग्नाला तर यायचंच, पण संध्याकाळच्या 'क्रियाकर्मालाही ' अवश्य उपस्थित रहायचं !'

पु. ल. परत त्याला मराठी शिकविण्याच्या भानगडीत पडले नाहीत !

□ □ □

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd No. MH 649

# माणूस

दोन वर्षांची ४५ रुपये वर्गणी
१५ ऑक्टोबरपूर्वी पाठवणारास

## स्नेहांकिता

स्नेहप्रभा प्रधान : किंमत सुमारे २५ रुपये
हे एक पुस्तक

किंवा

## कोठे आणि कधीतरी

डॉ. सुधीर फडके : किंमत १० रुपये

## रातराणी

विजय तेंडुलकर : किंमत १२ रुपये

ही
दोन पुस्तके
विनामूल्य
भेट

चालू डिसेंबरात : ट. ख. वर्गणीदारांचा

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर